म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११८९



आयबोलीची कहाणी

REFBK-0010237

—प्रद्युम्न

मायबोलीची कहाणी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..२२२२१..... विः ..निबंध.....
क्रमांक ..१२८९..... दि: १९/१०/२९

ले ख क :

प्रा. ना. गो. नांदापूरकर

REFBK-0010237

९०२३७



कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणें

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी,
कॉण्टिनेण्टल प्रकाशन,
टिळक रोड : पुणें २.

प्रथमावृत्ति : मे १९४७
द्वितीयावृत्ति : सप्टेंबर १९५९
सर्वाधिकार सुरक्षित
किंमत दीड रुपया

मुद्रक :
हरि महादेव गद्रे,
जनवाणी प्रिंटिंग प्रेस,
४५ बुधवार, पुणें २.

अनुक्रमांक 2२२२१ वि. निबंध
क्रमांक ...११६८... दि. १८/१०/५८
90236

कहाणीलेखकाचे दोन शब्द

गुणाच्या गुणी जनांनो, मराठीच्या मोहनांनो, रसिकतेच्या रंजनांनो, मीं मराठीची कहाणी कां लिहिली तें सांगतों, ऐका.

मराठी आपली मायाळू मावली, सगळीं सुखें तिच्या पावलोपावलीं, आपल्या कवींनीं तिचीं गाणीं गायिलीं, तिच्या चरणीं आपली वाणी वाहिली. त्यांनीं मराठीची विविध परीनें आरती केली, आपली त्रिखंड कीर्ति केली. त्यांत लहानमोठे होते, सरसनिरस होते; पण सर्वांचें दैवत एक 'मराठी'च होतें. अशा मराठी कवींची आठवण करावी नि मराठीची सेवा करावी. पण अज्ञानाचा वेढा पडला, मधीं मराठमोळा सांपडला. दहापांच मुखंड कवि सोडले, तर इतर सारे विस्मृतींत पडले. भावे आदि विद्वानांनीं मार्ग काढला आणि विस्मृतीचा बांध फोडला.

मराठीचा निवास सर्वांच्या मुखीं; तिच्या कवींचे नग असावे त्यांच्या बोटीं नखीं. थोरामोठ्यांनीं नथ, गळसरी केली, वर आपल्या कलेची कुसरी केली, मराठ्याच्या आनंदाची उजरी झाली. थोरांचें काम थोरांना शोभे, त्यांच्या दारीं इंद्राचे ऐरावत उभे. दरिद्र्याचे घर चंद्रमौळी, सदाच त्याची रिती झोळी. दरिद्र्याचा संसार उसनवारीचा अन् भर दो प्रहरींचा. दरिद्र्याला नथ-गळसरी कुठली? कष्टाच्या भट्टींत उसनवारी आटली, तिची मुदी केली, वर मराठीची नाममुद्रा ठोकली अन् मराठमोळ्याच्या बोटांवर घालावी म्हणून ही घडण झाली.

वागण्यावागण्याची रीत वेगळी, सांगण्यासांगण्याची रीत वेगळी नि नगानगाची घडण निराळी. कहाणीची जात अचपळ भारी. ती लहानांच्या मनीं वसते, तरुणांच्या कानीं लागते आणि म्हाताऱ्यांच्या ओठांवर नाचते. थोरांचे पंथ थोर, त्यांचे ग्रंथ थोर. त्यांच्या-

पुढें माझ्या कहाणीची काय कथा ? पण कहाणी ऐकतां येतें उठतां-बसतां. पहिल्यानं ही कहाणी येथील मराठी वर्तमानपत्राच्या संपादकांनीं ऐकली नि आपल्या पत्रांतून साऱ्या मराठवाड्यास ऐकविली. ती पुढें मराठवाड्यांतील मराठी साहित्य-संमेलनानें पदरांत घेतली नि आज महाराष्ट्रमंदिराच्या महाद्वारांत उभी केली.

हींत मराठीच्या जन्मापासून नाथापर्यंत मराठीचं कीर्तन केलं, अधीरतेनं तुकोबाचं दर्शन घेतलं. मनांत येतं, आजवरच्या सगळ्या मराठी कवींच्या कहाण्या सांगाव्या, अवघ्या मराठमोळ्यानं बसून ऐकाव्या. पण मी सांगणार कोण ? तिचीच वाणी न् तिचीच कहाणी. असेल तिच्या मनीं तर येईल तुमच्या कानीं.

आणिक एक सांगणं सांगायचं अन् मागणं मागायचं. मराठीचं धन अनर्घामोलाचं, जगांतील कोणत्याहि भाषेच्या तोलाचं. आवडीची वेडी जाती, अगुणांत गुण दिसती, गारांत हिरे हंसती, घराघरांत चिंतामणी गवसती. आपलं म्हणून फुगवून सांगत नाहीं, दुसऱ्यांचं म्हणून हिणवून दाखवीत नाहीं. पाहा म्हणजे दिसेल, करा म्हणजे होईल. पण दुराभिमान सोडला पाहिजे, कार्याला कास कसली पाहिजे. मराठीची कहाणी, मराठ्यांची वाणी. हिच्या शब्दांची घडण मराठी, वाक्यांची चढण मराठी. माझं मागणं तें किती ? दाता देईल लक्ष्मीपति. मराठीची कहाणी चालो अवघ्या सांगातीं. मराठीची कहाणी घराघरांत नांदावी, मराठी जनता मराठीच्या भजनीं लागावी, तिनें मराठी कवींचें स्मरण करावें, त्यांचं ऋण फेडावं आणि मराठीचं लेणं नव्या नवलाईनं घडावं.

मराठीची कहाणी
मराठी माय ! तुझ्याच चरणीं.

—ना. गो. नांदापूरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ..... दिः ..... लिबंध
क्रमांक ..... नों. दिः ..... १८।१०

पु र स्का र —

उस्मानिया विद्यापीठांतील मराठीचे विद्वान् आणि व्यासंगी प्राध्यापक श्री. नांदापूरकर यांनीं ही "मराठी मायबोलीची कहाणी" लिहिली आहे. मुकुंराजापासून तुकारामापर्यंतच्या मराठी वाङ्मयाचें दर्शन या पुस्तकांतील १५ कहाण्यांत, कहाण्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैलीनें, प्रा. नांदापूरकर यांनीं घडविलें आहे. हें पुस्तक गद्यांत लिहिलें असलें तरी वस्तुतः तें गद्यकाव्य झालें आहे. प्रा. नांदापूरकर हे उत्कृष्ट कवि आहेत व त्यांच्या या गद्यकाव्यांत शब्दालंकारांचा आणि अर्थालंकारांचा अकृत्रिम आविष्कार झालेला आहे. मराठी भाषा आणि वाङ्मय यांचा सर्वसामान्य परिचय इतक्या रसाळ भाषाशैलीनें आजपर्यंत कोणींच करून दिलेला नव्हता. मोत्यासारख्या शब्दांनीं, आणि छोट्या छोट्या वाक्यांनीं मुकुंदराज, महानुभाव कवि, ज्ञानेश्वर, एकनाथ आणि तुकारामादि भाषाप्रभूंच्या वाङ्मयाचें वैभव प्रा. नांदापूरकरांनीं रमणीय रीतीनें दाखविलें आहे व तें दाखवितांना स्वतःचें भाषावैभवहि प्रकट केलें आहे.

नरेंद्राच्या "रुक्मिणी-स्वयंवरा" चें त्यांनीं अधिक वर्णन करावयास हवें होतें असें वाटतें. कारण काव्य या नात्यानें मराठींतील कोणतेंच "रुक्मिणी-स्वयंवर" त्याची बरोबरी करण्यास समर्थ होणार नाहीं अशी त्याची योग्यता आहे.

रामदास व तत्कालीन व तदनंतरच्या भाषाप्रभूंच्या कहाण्या प्रा. नांदापूरकरांनीं त्वरित लिहाव्या अशी इच्छा प्रत्येक वाचकाला हें पुस्तक वाचून होईल. मॅट्रिक किंवा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना हें पुस्तक उपयुक्त व अनेक दृष्टींनीं अभ्यासण्यासारखें झालें आहे.

—शं. दा. पेंडसे

कहाणीची पाहणी

मायबोलीची कहाणी, नवलाईचीं बोलणीं, करावीं कोणीं, मोंगलाई-तल्या नांदापूरकरांनीं.

भले भले नांदापूरकर, तुम्ही कलमबहाद्दर, सांगितली कहाणी मनोहर, आमच्या मराठीची. तुमची कहाणी मनोहर, अगदीं मधुर मधुर, जशी खडीसाखर, वर्णावी कोठवर, तुमचे थोर उपकार, सर्व जनांवर. असली कहाणी, कधीं सांगितली नव्हती कोणीं, तुमच्या आलें मनीं, आणि आमच्या आलें कानीं.

आमची मायबोली, साक्षात् सरस्वतीची वेली, ज्ञानोबांनीं आमच्या आंगणीं लावली, मुकुंदरायांनीं खुलविली, मानभावांनीं फुलविली, चोखोबानें रंगविली, नामा शिंप्यानें शिंपली, जनाबाईंनीं भाकर घातली, मुक्ताबाईनें ओठीं लावली, मुक्तेश्वरांनीं चेतविली, तुकोबांनीं पालवली, रामदासांनीं जोगविली, रघुनाथ-वामनपंडितांनीं सजविली, अशी डौलानें, थाटानें, तोऱ्यानें चालली, वाढली, गरजली, वर गगनाला जाऊन भिडली, खालीं खोल पाताळांत पाय रोवून बसली,—असली, असली ही आमची मायबोली, हिला भीति कसली ? बोला जयजयकार, मायमराठीचा जयजयकार, तोच तुमचा-आमचा जयजयकार.

कहाणी म्हणजे आमचा पंचप्राण, आमचें मूळ जीवन, आमचें खरें धन, आमचें कोळें भोळें मन.

दर श्रावणांत यायची, भेटायची, राहायची, आमच्या पाठीवर ममतेचा हात फिरवायची, धीर द्यायची, गोड बोलायची नि मग जायची, पण कधीं नाहीं चुकायची.

पण हाय हाय, आमची कहाणीमाय, न कळे झालें काय, दिसेनात तिचे पाय, पुष्कळ रडलों धाय धाय, सुचेना कांहीं उपाय.

तोंडचं पळालं पाणी, तों आमची कहाणी राणी, झाली 'वत्सला-वाहिनी', नव्या थाटामाटांनीं, आमच्या 'संदेश' भाउजींनीं, आणली बहुमानांनीं, पाहिली सर्वांनीं, आनंद त्रिभुवनीं, उत्साह दाटला मनीं, उल्हास भरला जनीं, जयजय कहाणी राणी.

पहा कहाणीचा थाट, हिचा पैठणी घाट, काय मजा, कोण ऐट, हिची वीण किती दाट, हिचे भरजरी काठ, सूतपोत बळकट, शोभा दिसे प्रकट, म्हणून करा चटपट, लेऊन चला वाट धीट.

ही मायबोलीची कहाणी, नीट कराल पाहणी, तेव्हांच कळेल करणी, ही नांदापूरकरी जुळणी, चाखा मराठवाड्याचें पाणी, जागजागीं म्हणीच म्हणी, थोर थोर संतांची वाणी, शिलालेखांतल्या हिरकणी, ग्रंथोग्रंथींच्या वचनीं, भरली ठासून ही कहाणी, झाली मनतोखणी, बोला जय कहाणी.

चंपूचूर्णिका, चटक लाविली लोकां, मेवा अति सुरस देखा, पोटभर चाखा लोकहो.

पुणें
वैशाख व. १०।६९
१५।५।४७

—दत्तो वामन पोतदार

परिचय

मराठवाडा हा 'आद्य महाराष्ट्र' समजला जातो व मराठीची जोपासना व वाढ हीं आरंभीं मुख्यतः मराठवाड्यांतच झाली. ज्ञानेश्वर, रामदास, एकनाथ इ. मराठी शारदेचे मानकरी या मराठवाड्यांत होऊन गेले. तोच मराठवाडा राजकीयदृष्ट्या महाराष्ट्रापासून दूर गेल्यामुळें ती परंपरा टिकवूं शकला नाहीं. सत्तेचा अभाव व अज्ञान या दुहेरी पेंचांत मराठीची प्राचीन परंपरा येथें टिकूं शकली नाहीं.

अशी परिस्थिति असली तरी प्रतिभेची प्राचीन ज्योत अद्याप मराठवाड्यांत तेवत आहे. तिची जोपासना व वाढ करण्यास मराठवाड्यांत भरपूर वाव आहे. सरकारनें हें कार्य न केलें तरी जनतेनें तें आस्थेनें करणें अवश्य आहे. मराठीची जोपासना व वाढ मराठी बोलणारांनीं केली पाहिजे. हा प्रयत्न संघटितरीत्या आजच्या विज्ञानयुगांत होणें अवश्य आहे. अशा कार्याचा संघटित प्रयत्न मराठवाडा साहित्य परिषदेकडून थोड्या प्रमाणांत होत आहे. जनतेनें सक्रिय सहानुभूति दाखविल्यास या प्रयत्नास पुष्कळच यश येईल अशी आशा आहे.

प्रयत्नाचें पहिलें पाऊल म्हणून उस्मानिया विद्यापीठांतील विद्वान् प्राध्यापक श्री. नारायणराव नांदापूरकर, एम्. ए., यांनीं लिहिलेली 'मराठीची कहाणी' आम्ही प्रकाशित करीत आहोंत. तिचें सर्व महाराष्ट्रीय जनतेकडून स्वागत होईल अशी आशा आहे. प्रा. नांदापूरकर हे आरंभीं कवि म्हणून मराठवाड्यांत प्रसिद्धीस आले. त्यांचें 'वाग्विलास' हें काव्याचें पुस्तक सर्वांच्या माहितींतलें आहे. त्यानंतर मराठीच्या अध्यापनाचें कार्य औरंगाबादेस करीत असतांना फारसें काव्य किंवा लिखाण त्यांनीं लिहिलें नाहीं. त्यांची बदली नंतर हैदराबादेस उस्मानिया विद्यापीठांत झाली त्या वेळेपासून त्यांनीं लेखनाला पुन्हा आरंभ केला. हें लेखन पद्य नसून गद्य-स्वरूप जरी असलें तरी तें किती पद्यमय आहे हें वाचकांना या पुस्तकावरून कळेल. ते सध्यां पीएच्. डी. साठीं मराठी निबंध लिहीत असून तो यथाकाल प्रकाशित होईल, अशी आशा आहे.

पुढील प्रकाशनाला मदत होईल असें या पुस्तकाचें जनतेनें स्वागत केल्यास मराठीची अभिवृद्धि झाल्याशिवाय राहणार नाहीं अशी खात्री वाटते.

—ग. त्र्यं. माडखोलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: निबंध
क्रमांक ... नों. दि:

१. मराठीचा जन्म

आई, आई, आम्हांला तुझी कहाणी सांग ग ! काय सांगूं, बाळांनो, माझी कहाणी किती, तुमची अल्पमति; कोणाला रुचायची नाहीं; रुचली तर पचायची नाहीं. ऋषीचें कूळ अन् नदीचें मूळ तसेंच भाषेचेंहि मूळ कोणीं पाहूं नये; पाहिलें तर बोलूं नये. मग माझी कसली कहाणी ! बरं बरं, सांगत्यें ऐका.

फार जुन्या काळची गोष्ट. गंगामाई वहात होती, कृष्णाबाई गात होती, वारा नाचत होता अन् रानचीं झाडें डुलत होतीं. नगरें ऐश्वर्यांत लोळत होतीं अन् गांवें धुळींत खेळत होतीं. इतक्यांत चहूंकडून आभाळ झांकाळून आलें. काळ्या ढगांची नभांत दाटी झाली. कांहीं ढग पूर्वेकडून आले, कांहीं पश्चिमेकडून आले, कांहीं उत्तरेकडून उतरले तर कांहीं बऱ्याच काळापासून आभाळांत रेंगाळत होते. जवळचें माणूस ओळखूं येईना इतका अंधार पडला. पाहतां पाहतां दिवसाची रात्र झाली; चहूंकडे अंधाराचा समुद्र पसरला. त्यांत वरून मेघांचा गडगडाट अन् विजांचा चमचमाट मिसळला. पावसाला आरंभ झाला. सरींवर सरी येऊं लागल्या. थोड्याच वेळांत जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. ओढे फुगले. नद्या भरल्या. तळीं फुटलीं. डोंगर विरघळून जाण्याची वेळ आली. सगळी पृथ्वी बुडून जाते कीं काय

असें वाटूं लागलें. लोक त्रस्त झाले. कित्येकांच्या तोंडचें पाणी पळालें. कित्येकांच्या मनींचें धैर्य गळालें. जनलोकांनीं धावा केला. देव पावला. देवाजीनें पाहिलें. लोकांनीं गायिलें. मेघांची पांगापांग झाली. कांहीं मेघ डोंगरावर उतरले; तेथून दऱ्याखोऱ्यांत शिरले. कांहीं मेघ अरण्यांत फिरले ते तेथेंच विरले. कांहीं पश्चिमेस गेले ते समुद्रास जाऊन टेकले. कांहीं देशांत घुसले ते तेथेंच बसले. देवाची करणी अन् नारळांत पाणी म्हणतात त्याप्रमाणें देवानें कांडी फिरविली; मेघांचीं वेगळालीं कुळें झालीं. कांहीं मेघ राजक झाले; कांहीं भाज झाले. कांहीं अभीर झाले; कांहीं प्रमार झाले. कांहीं मल्ल झाले, कांहीं मिल्ल झाले. कांहीं सोमक झाले; कांहीं सोळंक झाले. कांहीं शक झाले; कांहीं अश्मक झाले. कांहीं आर्यक झाले; कांहीं द्रवीड झाले. सगळ्या मेघांचीं अशीं वेगळीं कुळें झालीं, महाराष्ट्रभर पसरलीं.

मेघकुळें वसलीं. धरणीमाता हंसली पण वीज नाहीं दिसली. देवाला वाटलें विजेलाहि येथें आणावें. आकाशांत मेघ असतां वीज मेघ-मंडळांतच होती. कधीं कडकडत होती, कधीं धरपडत होती. कधीं चमकत होती, कधीं धमकत होती. कधीं नाचत होती; कधीं हांसत होती. कधीं सरळ पळत होती, कधीं वांकडी वळत होती. तिला आतां भुईवर यावें लागलें.

देव म्हणाले, वीजबाई ! वीजबाई ! तुला कोणतें रूप देऊं?

वीज म्हणाली, ज्यांच्या संगतींत मी राहिलें, दुःख कष्ट साहिले, त्या माझ्या लोकांत मला नेऊन सोड. मला रूपाची आवड नाहीं, गुणांची आवड आहे. माझ्या लोकांच्या वाणीवर मला वसूं दे.

देव म्हणाले, 'तथास्तु.'

इकडे देवाचें आणि विजेचें हें बोलणें चाललें होतें अन् तिकडे निरनिराळ्या कुळांची बसायची गडबड चालली होती. देवानें या गडबडीची संधि साधली; चटकन् त्या गोंधळांतून एक मूर्ति उत्पन्न केली. काय तिचें रूप अन् किती तिचें तेज ! एका डोळ्यांत सूर्य, एका डोळ्यांत चंद्र, कपाळीं अरुणाचा पट्टा अन् शिरावर वरुणाच्या जटा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 22224 वि. निबंध
1182 नों. दि. 14/10/22

दांतांत सगळ्या तारकांनीं वसती केली. बुबुळांत निळ्या काळ्या नभानें विसांवा घेतला. भुंवयांच्या ठिकाणीं इंद्रधनुष्य लपलें. एका गालावर उषा हसूं लागली, एका गालावर संध्या दिसूं लागली. मोहक बांध्याची अन् अचपळ गतीची. मूर्ति लहान पण कीर्ति मोठी. असें तिचें तें मनोहर रूप पाहून सगळ्या लोकांना आनंद झाला. तिचे भक्त होऊन लोक नाचूं लागले. सारा देश गजबजून गेला.

देवानें तिच्यासाठीं महाराष्ट्राचा पाळणा केला. त्यावर आपल्या कृपेचा चांदवा केला. त्याला सह्य आणि सातपुड्याचीं खेळणीं लटकाविलीं. चांदव्याच्या भंवतीं वनश्रीची झालर. कृष्णा-गोदा यांचा गोफ विणून पाळण्याला हालविण्यासाठीं दोरी केली. इकडून माता-पूरवासिनी रेणुका आली; इकडून तुळजापूरची आई भवानी आली. त्यांनीं पाळणा म्हटला. साधुसंतांनीं तिचें नांव 'मराठी' असें ठेविलें. बाळांनो, हीच तुमची माय मराठी — आमची कहाणी थोडी. तिची अवीट गोडी.

ही कहाणी ऐकल्यानें काय होतें ? अंगींचा आळस जातो. कर्तृत्वाचा कळस होतो. मोठ्यांचा दुरभिमान जातो. लहानाअंगीं स्वाभिमान येतो. देशाचें दारिद्र्य दूर होतें. काशीची कावड रामेश्वराला जाते. गंगथडीचा हुरडा काबुलांत भाजतो. काबूलचा मेवा परसांत पिकतो.

आमची कहाणी लहान, तुमची हरो भूक-तहान. जा, आतां निजा बरं, बाळांनों; मी उद्यां दुसरी गोष्ट सांगेन.

* * *

२. मराठीचें बालपण

या रे भानुभास्करांनो, दिनु-दिनकरांनो, सख्यासुकुमारांनो, तुम्हांला मी आज मराठीच्या बाळपणाची गोष्ट सांगत्यें. मराठीचा जन्म झाला. लोकांनीं हर्षाचे हुडे उभारिले, वर्षाच्या गुढ्या लावल्या. नद्या समुद्रांत कालवल्या. डोंगरांनीं चौधडे वाजविले. ओढ्यांनीं सनई वाजविली. हिरव्ळीनें पायघड्या घातल्या. धरणीमातेनें साज केला. आभाळानें मांडव घातला. क्षितिजानें त्याला झालर लावली. वनश्रीनें रांगोळी काढली. झाडवेलींनीं फळें-फुलें आणलीं. वाऱ्यानें दवंडी पिटली, 'मराठी आली', 'मराठी आली.' गांवच्या गांवकऱ्यांना आनंद झाला. पाटलांनीं चावडीवर रामराम घेतले. पांड्यांनीं देशाचा पट्टा करून दिला. वेसकरानें खुळखुळा वाजविला. जोशानें पत्रिका लिहिली. वाण्यानें साखरपानें वांटलीं. जनलोक म्हणूं लागला, 'आमची मराठी आली', 'आमची मराठी आली.'

कशी आली ? काय आली ? काय नेसली ? काय पांघरली ?

नव्या मनूची पहांट झाली. नव्या दमानें धमकत आली. जुनें सोनें अंगावर घाली, नवीं पेवें उघडीं केलीं. महाराष्ट्रीनें दोरा भरला, प्राकृताची अंगी ल्याली. अपभ्रंशाची कुंची घाली. कानडीचे कसे केले. तेलंगीचे गोंडे लावले. संस्कृताचें बाळसें अंगावर खेळतें. संस्कृतीचें वारें

मनांत घोळतें. दिसामासा वाढूं लागली. एकेक गुण काढूं लागली. लोकांचें मन ओढूं लागली. पोर आतां उफाड्याची दिसूं लागली. साऱ्या महाराष्ट्राची हिनें अंगणओसरी केली. चहूंकडे हिची फेरी होऊं लागली. देशाचें दळण दळूं लागली; दळतां दळतां गाऊं लागली; गातां गातां कांडूं लागली. वैऱ्याशीं भांडण भांडूं लागली.

ही बाळपणची कळी मनानें मोकळी, गुणांनीं आगळी, सगळ्यांत सगळी अशी होती. दुडुदुडु चालायची, गुलगुल बोलायची, लुडुलुडु पळायची, मोठी मोहक खेळायची, हिला घोड्यावर बसून फिरण्याचा, अन् गोष्टी सांगण्या-ऐकण्याचा मोठा नाद. भीमथडीची घोडी घ्यावी, तिला कृष्णाकांठची होटाळी घालावी, गंगथडीचा हुरडा सर्व देशभर खात फिरावें. कधीं वऱ्हाडांत बिऱ्हाड टेंकवावें, कधीं सह्याद्रींत पारध करावी, कधीं सातपुड्यांत भटकावें, तहान लागली म्हणजे कोंकणांत जाऊन नारळांतील पाणी प्यावें. फिरून फिरून थकली, कुठें तरी टेकली म्हणजे ही गोष्टींची वेल्हाळ गोष्टी सांगे; अन् निरनिराळे खेळ खेळून करमणूक करून घेई. कधीं गुजराथीशीं कानगूज करी, कधीं उडियेसंगें उड्या मारी, कधीं बंगालीशीं गौडबंगाल करी, तर कधीं कानडीशीं ' अवडक चवडक दामाडू ' खेळे; अन् कधीं कधीं तेलंगीशीं ' रावे रावे तेलंगी, बसा बसा पलंगीं ' म्हणून पिंगा घाली.

हिच्या अंगांत अगणित कला भरल्या आहेत, डफा-तुणतुण्याची साथ द्यावी, वीणा-मृदंगाची गत गावी, बैठकींत गंभीर बसावं, राजकाजांत तोलून बोलावं, सासुरवासिनीसह जपून चालावं, माहेरवासिनीसह हसावं-खेळावं, मित्रामित्रांत विनोद करावा, पोरांमध्यें नाचावं-बागडावं, आजीबाईच्या गोष्टी कान लावून ऐकाव्या. आयाबायांचीं गाऱ्हाणीं या कानानें ऐकावीं, त्या कानानें सोडून द्यावीं. हिचे खेळ तरी किती ! पोरांसह वेगळेच खेळावे; पोरींसह वेगळेच खेळावे; थोरांपोरांसह वेगळेच खेळावे आणि पोरांपोरींसह वेगळेच खेळावे.

बाळपणापासूनच ही आचारानें शुद्ध अन् विचारानें प्रबुद्ध आहे. अरुणोदयीं उठावं, शब्दांचा सडा घालावा. भक्तिनदींत आंघोळ करावी, शुद्धाचाराची रांगोळी काढावी, भावार्चीं अक्षताफुलें घ्यावींत अन्

श्रद्धेनें भूपाळ्या गात गात देवदर्शनास जावें. विठामाईचें दर्शन घ्यावें, तिला तुळशी-मंजिरी वहावी, औंढ्या नागनाथाचें दर्शन घ्यावें, त्याला बेल वहावा; वैजनाथाला फूल वहावें, घृष्णेशाला धोतरा अर्पावा, त्र्यंबकाला कमल वहावें, जोगाईला अक्षता वहाव्या, तुळजाभवानीला कवड्यांची माळ घालावी, मानापुरास पोत पाजळावा, महालक्ष्मीला गुलाल वहावा आणि जेजुरीच्या खंडोबावर भंडार उधळावा. असा हिचा पहांटेचा नित्याचा क्रम असे.

खुळखुळ वाळे हिच्या हातीं पायीं चाळे. दिवसभर ही कधीं गप्प म्हणून बसायची नाहीं. कधीं वाण्याच्या दुकानीं जाऊन गोण्यांची उलथा-पालथ करील, तर कधीं शेतकऱ्यासंगें शेतांत जाऊन औत धरील. कधीं तेल्याचा घाणा हांकायची, तर कधीं गुराख्याचीं गुरें राखायची. कधीं तांबोळ्याचीं पानें फेरायची, तर कधीं कुंभाराचा आवा भरायची. कधीं साळणीसंगें लुगडें विणायची, तर कधीं माळणीसंगें माळवें विकायची. कधीं जोग्याचा जोगवा मागे, तर कधीं जोशाचें पंचांग सांगे. कधीं सोनाराच्या नळींत बसून आगींतल्या सोन्याची कळी खुलवायची, तर कधीं लोहाराच्या भट्टीवर घांव बसवून चाक घुसळवायची. अशीं अठरापगड जातींचीं कामें करायची. लटकेंच रुसायची, लटकेंच फुगायची. कधीं हंसायची, कधीं हंसवायची. कधीं खेळायची, कधीं खेळवायची. कष्टाच्या वेळीं हातभार लावायची, श्रमी जिवाचा घाम पुसायची. हिला आपपर नाहीं, हिला लहानथोर नाहीं. कोणताच भेदभाव माहीत नाहीं. सगळ्या जाती सारख्या. मेघाचें पाणी काळ्या रानीं पिकली धरणी, भरल्या गोणी. गोणींचें धान्य कोणींहि खावें. त्याला सण नाहीं, वार नाहीं, लहान नाहीं, थोर नाहीं, महार नाहीं, पोर नाहीं; नदीचें पाणी कोणींहि प्यावें. त्याला सण नाहीं, वार नाहीं, लहान नाहीं, थोर नाहीं, महार नाहीं, पोर नाहीं. तशी ही मराठी सगळ्यांवर सारखीच मायेची पांखर घाली. शब्दांची साखर पेरी. हिच्या अर्थाची गोडी वानितां थोडी.

बाळपणापासूनच हिला लोकांची कळकळ वाटते. सगळ्यांचे संसार सुखाचे करावे, देशाचें दैन्य दूर करावें, म्हणून हिनें आपलें अमूल्य

भांडार उघडें केलें. त्यांत सगळ्या वस्तु सांठल्या होत्या, कशाची उणीव नव्हती. मराठीचा वाण अन् जादूची खाण. कोणींहि यावें. कांहींहि घ्यावें. ज्यानें त्यानें आपली आवड पाहावी, वस्तु उचलावी. वस्तूला मोल ठेवलें नव्हतें. भावांत घासाघीस नव्हती. जुनी वस्तु द्यावी, नवी घ्यावी; जुनीला उजळा द्यावा, चकचकीत करावी. जुनीची मोडतोड नवीनें भरून काढावी. जुनी वस्तु नसल्यास नवीनच घडवून घ्यावी. लोकांनीं वस्तु उचलण्याचा सारखा सपाटा चालविला. कोणीं विळे-कोयते घेतले, कोणीं बोरू-टांक घेतले. कोणीं थापी घेतली, कोणीं रापी घेतली. कोणीं नांगर घेतले, कोणीं वखर घेतले. कोणीं खांड, फरस, भाले घेतले, कोणीं मोती, माणि, घाणे घेतले. कोणीं घट, माठ घेतले, कोणीं घरडी, दुरडी घेतली. कोणीं व्यापार-उदिमाच्या वस्तु घेतल्या, कोणीं पोटापाण्याच्या वस्तु घेतल्या. कोणीं साधन घेतलें, कोणीं विखन घेतलें. कोणीं सर्व घेतलें अन् संसाराचें पर्व केलें, कोणीं वारलें घेतलें अन् संसाराचें सारलें केलें. अशी ही मराठी बाळा, सोन्याची शिळा, सुखाची वेळा. आमची कहाणी थोडी, तिची अवीट गोडी. जा, आतां निजा बरं, बाळांनो; मी उद्यां पुढली कहाणी सांगेन.

* * *

३. पंडितांची पुंडाई आणि मराठीची माया

या रे सोन्या-सोनकुल्यांनो, चिमण्या-छकुल्यांनो, तान्ह्या-पाडसांनो, मी आज तुम्हांला मराठीची कहाणी पुढें सांगत्यें ऐका.

गुणाची गुणवंती, रसाची रसवन्ती. वयानें वाढली, नांवारूपास चढली. गांवच्या गांवकऱ्यांतून खेळतां खेळतां ती राजद्वारांत गेली, राजमंदिरांत शिरली. कुकूऽच कूऽ कोंबडा ओरडला. राजाच्या राणीला ढवळा झाला. दासीबटकीला आनंद झाला, आप्तेष्टांना हर्ष झाला, सोन्याचा दिवस उगवला. अनुभवी बायकांनीं दासींना सांगितलें, 'राजाला बोलवा, राणीचे डोहाळे पुरवा'. इकडे राणीला न्हाऊंधुऊं घातलें, खाऊपिऊं घातलें. राणीनें सोळा शृंगार केले; कपाळीं कुंकूं लावलें, डोळ्यांत काजळ घातलें, मांगांत गुलाल भरला, फुलांची वेणी घातली. राणी नवें नेसली, पलंगीं बसली. राजा आला, पलंगीं बसला. राणीचा हात धरून राजानें पुसलें, "देवीची इच्छा काय आहे? पक्वान्नें सांगा, पक्कान्नें करवितों. वस्त्रेंपात्रें सांगा, आत्तां आणवितों. शत्रूचें नांव घ्या, त्यास धुळीस मिळवितों. मन इच्छील तें कोड पुरवितों."

राणी बोलली, "आपली मराठी गुणांनीं गोपी, बोलायला सोपी. अवघ्या लेकरांची माय आहे, दुधावरली साय आहे. ती आपणांस कधीं विसरत नाहीं. ती शेतकऱ्यांचें शेत राखते तशी आपल्या भाल्याच्या

पाल्याचें पाणीहि चाखते. ती आंतबाहेर गोड, तिची आपली जन्माची जोड, ती तर संसाराला सुघड, तिचा कारभार उघड. मग तिला राजसभेंत मान कां हो नाहीं ? मला वाटतें, तिला पालखींतून मिरवावें, नगरांतून फिरवावें, सिंहासनावर बसवावें."

राणीचं बोलणं, जाईचं फुलणं. जाईच्या फुलाचा सुवास मधुर; राणीचं बोलणं मोहक, चतुर. राणीची गोष्ट राजाच्या मनाला आली. मराठी सिंहासनाची पायरी चढली.

राजाचें कृत्य पाहून पंडितांनीं त्रागा केला. जो तो पंडित म्हणूं लागला, " भ्रष्टाकार झाला, भ्रष्टाकार झाला. संस्कृत भाषा देवाची वाणी, मराठी भाषा गढूळ पाणी. हिला वेदाचा अधिकारि नाहीं. व्याकरणाचा संस्कार नाहीं. हिला स्मृतींची ओळख नाहीं, शास्त्रांची पारख नाहीं. हिला उपनिषदांचा स्पर्श नाहीं, षड्दर्शनांचें दर्शन नाहीं. हींत 'अयं घटः' नाहीं, हींत 'अयं पटः' नाहीं. हिच्यांत पुराण नाहीं, हिच्यांत रामायण नाहीं, हिच्यांत भागवत नाहीं, हिला हरिकथा सांगवत नाहीं, हिच्यांत गायत्रीचा मंत्र नाहीं, यज्ञयागाचें तंत्र नाहीं. हिला ज्ञानाचा दारवठा माहीत नाहीं, हिला कर्माकर्माचा वरवंटा माहीत नाहीं. कालची पोर कानामागून आली, तिखट झाली. हिच्यांत काव्याची कुसरी नाहीं, रसांची मंजिरी नाहीं. हिला नाटकाची नांदी माहीत नाहीं, ग्रबंधाची बांधणी माहीत नाहीं. फार काय, हिला आचार नाहीं, विचार नाहीं, सोंवळं नाहीं, ओवळं नाहीं. राजा ! ही स्त्रीशूद्रांची वाणी. हिला सिंहासनावर बसवून तूं महापातक करतोस, धर्म बुडवितोस, संस्कृति रसातळाला पोंचवितोस. आम्ही हिला मानीत नाहीं. आम्ही हिच्यांत ग्रंथरचना करीत नाहीं."

पंडितांचा राग खैराची आग. पंडितांचा राग गव्हाळ्याचा नाग. वैर विसरायचा नाहीं, दंश चुकायचा नाहीं. पण राजानें पंडितांच्या रागाकडे पाहिलें नाहीं. राजा बोले दळ हाले, पंडित खाती झाडपाले. राजानें प्रधानाला आज्ञा केली, आज्ञापत्रकावर मराठीनें आपली मुद्रा केली. पाटीलपांड्यांना शेतांचीं लावणीपत्रकें लिहिण्यास सांगितलें, त्यांत

मराठीनें मोत्यांच्या अक्षरांची लावणी केली. जनलोकांना मस्तकें लिहिण्यास शिकविलें, त्यांत मराठीनें आपले हस्तक पाठविले. टांकसाळींत नाणीं पाडलीं, त्यांवर मराठीनें आपलीं पावलें काढलीं. राजानें दानपत्रें लिहिलीं, त्यांवर मराठीनें आपल्या झारींतून पाणी सोडलें. राजानें शिळा घडली, तीवर मराठीनें आपली रेघ ओढली. दगडावरली रेघ पुसतां पुसत नाहीं, मराठीचा संसार आवरतां दिसत नाहीं.

मराठीचा वेल मांडवाला चालला, पंडितांनीं आकांडतांडव केला. आभाळाला भोंक पाडतां येत नाहीं. चंद्राचा हरिण चोरतां येत नाहीं. पाण्याचा पर्वत करतां येत नाहीं. माणकांचा सैंपाक रांधतां येत नाहीं. हें त्या पंडितांना काय माहीत? त्यांनीं मराठीचा छळवाद मांडला. तिचा तिरस्कार केला. जो तो म्हणे फट् फट् पापी चांडाळणी, दूर हो, दूर हो. आमच्या वाणीला तुझा विटाळ होतो. तुझ्यानें आमचे आचार बुडतात, विचार दडतात. तुझ्यानें वर्णसंकर होतो. दूर हो, दूर हो, सोन्याची सुपली मोत्यांनीं गुंफली; पण पंडितांच्या डोळ्यांत कणासारखी खुपली. पंडितांच्या दुरभिमानामुळें घरींदारीं तट पडले. बापलेकांत अबोला आला, मित्रामित्रांतून विस्तु आडवा जाईनासा झाला, नवरा-बायकोचें पटेनासें झालें. एकाचें तोंड इकडे तर एकाचें तोंड तिकडे, अशी गत झाली.

पंडित पतीची मराठी बायको, याचें बोलणें तिला कळेना, संसाराचें सूत वळेना. पंडित म्हणाला, 'पानमानय.' बायकोनें पान आणून ठेवलें. पंडित म्हणे, 'पाणिं दद्यात्', बायकोनें पाणी आणून पुढें ठेवलें. पंडित सांगे, 'अनुरागं कुरु', अनसूया रागानें लाल झाली. पंडित विनवी, 'महिषी, मा कुप्यस्व'. बायको म्हणाली, 'मेलं जिभेला हाड तरी! मी म्हैस काय? ही पहा मी माहेरीं चालल्ये.' पंडित म्हणाले, 'अयि सुंदरि आगच्छ'. बायको म्हणाली, 'आतां धन्य झाली. तुमची बुद्धि बारगळली. अहो, मी तुमची बायको आहें.' अशा प्रकारें कळत नकळत कलह होऊं लागले. पंडितांच्या संसारांत ब्रह्मघोटाळे माजूं लागले.

पंडितांनीं मराठीचा तिरस्कार केला; पण मराठीनें उलट त्यांचा सत्कार केला. तिनें पंडितांचें पाणी जोखून पाहिलें, पंडितांचे घाव हंसून

साहिले. पंडितांच्या वर्तनावरून तिनें ओळखलें कीं, वठला वासा वांकतां वांकत नाहीं, किरणाचा दोर कातता कातत नाहीं. पंडितांचें गाणें जुनें नाणें, हाटांत कांहीं विकत नाहीं, कामांत कांहीं टिकत नाहीं. पंडितांची वाणी मोत्याचें पाणी, पण त्यानें भांडें कांहीं भरत नाहीं, तहान कांहीं हरत नाहीं. पंडितपोरें पिकलीं बोरें, पण त्यांना कीड लागण्याचा संभव होता. पंडित पक्षी आकाश लक्षी; पण भुईवर त्याला उतरावेंच लागणार. यास्तव त्यांच्या घरट्याचा घाट काय? संसाराची वाट काय? आपल्या इतर लेकरांसह त्यांचा थाटमाट कसा राहील ही चिंता वाटूं लागली. मराठी मावली सगळ्यांची सांवली. अवघ्यांच्या सुखाची तिनें सोय लावली. अशी आपली मराठी मोठी मायाळू आहे. बरें, बाळांनो, जा आतां निजा; मी उद्यां पुढली कहाणी सांगेन.

* * *

४. मराठीची तपश्चर्या

या रे चिमण्या चकोरांनो, राम-लक्ष्मणांनो, भीम-अर्जुनांनो, मी तुम्हांला मराठीच्या तपश्चर्येची गोष्ट सांगत्यें.

पंडितांनीं राग केला, मराठीचा त्याग केला. ग्रंथांतरीं मराठीला रीघ नाहीं मिळाला. देव-देवतांनीं माया केली, साधु-संतांनीं छाया केली, तेथें पंडितांनीं मात्र कांड्यांचें सरवण केलें; मराठीचें वाळवण मांडलें; पण देवाचं देणं तियं काय उणं. गंगेचा ओघ दो हातांनीं अडत नाहीं, हिमालय पर्वत फू म्हटल्यानें उडत नाहीं. पंडितांवांचून मराठीचें कांहीं अडलें नाहीं. घरींदारीं मराठी सारखी वाढूं लागली. साहित्याचा सोपान चढूं लागली.

राजानें मान दिला, जनांनीं कान दिला, मराठीनें खेळ केला. पंडित कुढत राहिले, मराठीचं तेज वाढत राहिलें. जो तो मराठींत रचना करूं लागला. नवें गीत गाऊं लागला. नवी रीत दावूं लागला. आजीबाईंनीं उठावें, भूपाळी म्हणावी, पंढरीरायाला आळवावें. 'जेणें रसातलउणु मत्स्यरूपें वेद आणियले, मनु शिवक वाणियले, तो संसारसागरतारण मोहंतो रावी नारायणु'. शंखासुरें वेद नेले, हरि मत्स्यरूप झाले, रसातळाचें भेदन केलें, तेथून वेद घेऊन आले. मनूचा मान केला, शिवाची स्तुति केली. संसारसागरांतून तारणारे, मोहाला मारणारे,

अशी लीला करणारे देव नारायण. असें आजीबाईंनीं गीत गावें, नित्य रमावें. मैत्रिणींनीं झोपाळ्यावर बसावें, परोपरीचीं गाणीं गावीं, घरोघरची रीत सांगावी. उखाणा घालावा, आहाणा घ्यावा. मुलींनीं फुगडी खेळावी वनांत, चाफ्याचें फूल खोवावें कानांत. सूनबाईंनीं अडून पण भीड न तोडून गुणगुणावें 'सासूचा सासरवास, नका करूं सासूबाई, चाफ्यासाठीं आली जाई.' पोक्त्या सवरत्या बायांनींहि कोणीं रासन्हाण गावें, कोणीं मासन्हाण गावें, कोणीं डोहाळे म्हणावे, कोणीं सोहाळे वर्णावे, कोणीं आदितवारची कहाणी सांगावी, कोणीं सोमवारची कहाणी सांगावी. अशा प्रकारें गाण्या-उखाण्यांचा आणि आहाण्या-कहाण्यांचा पाऊस पाडला, मराठीचा नवस फेडला.

पुरुषांनींहि परोपरीनें प्रयत्न केला, मराठीचा रथ धडधडत नेला. कोणीं गुणाढ्याच्या बृहत्कथेंतील कथा सांगितल्या, कोणीं राम-रावणांचें युद्ध वर्णिलें. कोणीं कौरव-पांडवांच्या कथा सांगितल्या. कोणीं देव-दैत्यांच्या कथा सांगितल्या. कोणीं वेताळपंचविशीच्या गोष्टी सांगितल्या. कोणीं 'पिंगलकु पुसे दमनकु सांगे' म्हणून पंचतंत्राच्या कहाण्या सांगितल्या. कोणीं हितोपदेशांतील उपदेशांच्या कथा सांगितल्या. कोणीं पूर्वजांच्या पराक्रमाचे पवाडे गाइले. कोणीं साधुसज्जनांच्या संसारांचें चित्र रंगविलें. लहान मुलांनींहि कावळा-चिमणीच्या गोष्टी सांगितल्या. भावा-बहिणीच्या कहाण्या ऐकल्या आणि राजा-राणीच्या कथा गाइल्या. असा सईचा संसार वाढूं लागला, साहित्याचा भाव चढूं लागला. पण वळवाच्या पावसानें शेत पिकत नाहीं, क्षणिक गाण्या-कहाण्यांनीं वाङ्मय टिकत नाहीं. मराठीला वाटलें आपला ओघ अखंडित वहावा, आपलें वाङ्मय अक्षर व्हावें, पंडितांनीं त्याकडे आदरानें पाहावें.

टाकीचे घाव सोसल्यावांचून देवपण येत नाहीं, देवाचें अधिष्ठान असल्यावांचून यश मिळत नाहीं. यास्तव मराठीनें तपश्चर्या मांडली. मराठे लोक अन् चिवट फाक. 'दढमडह सामलगे' बळकट अंगाचे आणि सांवळ्या रंगाचे, 'सहिरे अहिंमाण' सोशिक तसे अभिमानी. 'कलहसीले' प्रसंगीं भांडण्यास न भिणारे, 'य दिण्णले गहिले उल्लविरे' दिन्हलें घेतलें असें बोलणारे, 'तत्थ मरहट्टे' असे जे मराठे,

त्यांची माय मराठी. ती दुःखा-कष्टाला घट्ट, तिला सुखाची नाहीं चट, तिनें कायेची सर्व माया सांडली, अलौकिक दिव्य तपश्चर्या मांडली. तीव्र तिची रीत भात वेगळी, तिची तपश्चर्या वेगळी. तीर्थयात्रा करावी, दानधर्म करावा; दीनांचा सांभाळ करावा, आर्तांचा प्रतिपाळ करावा. देवळें बांधावीं, मठ स्थापावे, पुजाऱ्यांच्या पोटापाण्याची सोय लावावी, विद्वानांस वेतन द्यावें, विद्येस उत्तेजन द्यावें, सदा सर्वांच्या कारणीं पडावें, चित्तांत परमेश्वर ध्यावा, वाणीनें परमेश्वर गावा आणि हातानें त्याच्या लेंकरांची सुखसोय करावी.

रानीं वनीं फिरली अन् गारदौंडांत अवतरली. पळसदेव गांवांत तिनें पाल ठोकलें. तेथें श्री विष्णूची पूजा केली. त्यांच्यासाठीं 'विष्णुगृह केलें' (ते) 'ईश्वर संवछरीं नीफजल' 'स्तंभा नीष्कृती सोनेया साहस्र एकु' अशी मराठीची कीर्ति सरडेश्वराच्या देवळांतील दगडही आजवर गाती.

तुळजा भवानी जगाची जननी, मराठी तिच्या दर्शनास आली, सावरगांवच्या रानीं कदंबमंडलेश्वराच्या सदनीं भजन-पूजन केलें, कथा-कीर्तन केलें. महिनोमहिनीं कीर्तन व्हावें म्हणून "अंबादेवीचे आ कीर्तनासि–मासप्रती २ द्रामदत्त."

तेथून निघाली पश्चिम सागरास गेली. सागराचें स्नान केलें, 'परळ' गांव पाहिलें, तेथें वैद्यनाथाची स्थापना केली. पूजेसाठीं पुजाऱ्यांस देणगी दिली. लोक लोभी. शासन मोडतील. देणगी पाडतील म्हणून 'तेया' श्री वैद्यनाथाची आण घातली. "अथ तु जो कोणु हुवि ए शासन लोपी तेया श्री वैद्यनाथ देवाची भाल सकुटुंबिआ पडे–"

परळाहून सुटली, खानदेशाची शीव गांठली. पाटण गांवांत एक मठ स्थापन केला. तेथें भास्कराचार्य ज्योतिषी ज्यानें ज्योतिषशास्त्राची ज्योत पाजळली, भारताची कीर्ति त्रिखंड उजळली. त्याचा नातू चांगदेव, त्याला मठ बांधून दिला, ज्योतिर्विद्येचा विकास केला. यादवांचे मांडलिक सोइदेवास बोलली, 'राजा ! चांगदेवास हातीं धर. मठाची सोय कर.' भवानीच्या मंदिरांत राजा बोलाविला. भवानीला साक्ष करून

लेख लिहविला. राजानें पाटणच्या उत्पन्नावरील आपला कर मठास लावून दिला 'इयां पाटणी' जे केणें, उघटे तेहाचा आसि आउ जो राउला होता ग्राहकापासी तो मढा दीन्हला. अजूनही भवानीनें तो लेख आपल्या मंदिरांत जतन करून ठेवला आहे.

पाटणाहून निघाली, आंब्यास आली. तिनें जोगाईचें दर्शन घेतलें, खोलेश्वराच्या मनाची खोली पाहिली. पुष्कळ ब्राह्मणांना भूमि-दान दिलें.

आंब्याहून नेवाशास गेली, तेथें नावेक निवास केला. ज्ञानेश्वरासाठीं तिनें चौरंग मांडला. तेथें ज्ञानेश्वर येतील, ज्ञानेश्वरी लिहितील, थकवा येतां खांबास टेकतील. त्यांच्या पाठीवरून मायेचा हात फिरविण्यासाठीं खांबांत शब्दरूपानें राहिली.

नेवाशाहून निघाली पंढरी पाहिली. चंद्रभागेतीरीं वसली पंढरी. पंढरपूर नगर भक्तीचें आगर, वारकऱ्यांचें माहेर-घर. मराठीनें चंद्रभागेंत स्नान केलें, विठामाउलीचे चरण वंदिले. भक्तां भेटली, भक्ति लुटली, आनंदाची शीग लोटली. चंद्रभागेच्या वाळवंटांत फड मांडला, झेंडा रोविला. पताका रोविल्या. भजनी मेळे गोळा केले. हरिनामाचा गजर केला. रावळांत चौऱ्यायशीचा लेख लिहिला. सूर्यचंद्र गगनीं तळपती तोंवर पूजा चालव म्हणती, जाळदांड्यानिमित्त भक्तजन पैका अर्पिती, त्या पैक्यांचा विवरु मराठीनें चौऱ्यायशीच्या लेखांत केला. "श्री विठ्ठलदेव रायासि तिसा सिति फुलें दांडे आचंद्रार्क चालविआ नाना भक्त मालीआं दत्तपैकाचा विवरु." देव प्रसन्न झाले. देवानें वरदान दिलें, 'या लेखाला जो पाठ घाशील त्याची चौऱ्यायशी लक्ष योनीची येरझार चुकेल. माय, तुझें भाग्य उदयाला येईल. तुझें वाङ्मय माझे गुण गाईल. त्यानें लोक तरतील, पापी उद्धरतील. साधुसंतांचाही तुला आशीर्वाद मिळेल. बुद्धिवंतांचा मोह नाहींसा होईल. आतां तूं येथून उनकेश्वरास जा, तपश्चर्येची सांगता कर.'

मराठी मावली माहुरास आली, उनकेश्वरी राहिली. तीर्थस्नानानें देह पावन केला. उनकेश्वराच्या देवळाचा जीर्णोद्धार केला. माहुरास भरतां मेळा, जन लोक होती गोळा. त्यांना तीर्थाचा इतिहास सांगितला.

" त्रैतायुगी रामुः वनवासप्रसंगीं: सरभंगाचआ आस्रमा आले : सरभंग प्रीत्यर्थः हे उदक उष्ल (उष्ण) केले : तदा कालास दवरीचेत तीर्थ हेः " उनपदेव पावले कौतुक दावले. मराठीचा भाव मनांत ठसला, मराठीचा ठसा देवळावर उमटला.

मराठीनें यापरी आयुष्याच्या पहिल्या प्रहरीं तीर्थोदकांचें स्नान केलें, देवादिकांचें दर्शन घेतलें, साधुसंतांचा आशीर्वाद घेतला, ब्राह्मण विद्वानांचा परामर्ष घेतला. जनलोकांचा संग्रह केला, बहुपरी गुप्तदान दिलें, देवळांचा जीर्णोद्धार केला. तपश्चर्येनें अक्षय वाङ्मयाचा ठेवा मिळविला.

जा, आतां निजा बरें, बाळांनो; मी उद्यां पुढली कहाणी सांगेन.

* * *

५. मराठींतील आदि-काव्य

या रे गोविंद-गोपाळांनो, जयंत-जयपाळांनो, वेणू-वेल्हाळांनो, मी आज तुम्हांला मराठीची कहाणी पुढें सांगत्यें. ऐका.

मराठीनें तप केलें. देवतांनीं वर दिले. साधूंनीं आशीर्वाद दिले. मराठींत अक्षरवाङ्मय निर्माण होऊं लागलें. वैनगंगातीरीं वसली अंबानगरी, तेथें मराठीनें परोपरी क्रीडा केली. राजाची सभा भरली, मराठीची चिंता हरली. राजाच्या मनांत आलें, मराठीचें दैन्य गेलें. दैवयोग घडला, चिंतामणि सांपडला. राजास अकस्मात मुकुंदराजांचें दर्शन घडलें. राजानें मुकुंदराजांचे पाय धरले. तेथें चित्त ठसलें, देहभाव हरपला. राजानें अनुग्रह मागितला. मुकुंदराजांनीं राजास ब्रह्म-साक्षात्कार करून दिला.

राजानें विनंति केली, "जी जी मायबाप देवा ! मराठीची सेवा कांहीं घडावी या देहा. जनलोक पावन होतील, हा दास उद्धरेल. आपली कीर्ति होईल, मराठीची 'सरती' होईल." मुकुंदराज हंसले, ध्यानस्थ बसले. ध्यानांत सद्गुरु दिसले. सद्गुरूंनीं आज्ञा केली, 'मराठींत काव्य कर, जनलोकांचा उद्धार कर.'

सद्‌गुरूंची आज्ञा शिरीं धरली, राजाची विनंति उरीं धरली, मुकुंदराजांनीं मराठी काव्यास आरंभ केला. त्यांनीं पाहिलें, लोक घसरले, वैदिक धर्म विसरले. पंडितांनीं हात आंवरला, अज्ञ समाज बावरला. यास्तव 'वेदशास्त्राचा मथितार्थू । मऱ्हाठिया होय फलितार्थू । तरी चतुरीं परमार्थू । कां न घ्यावा ?' असा मनीं संकल्प केला. 'शक अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू । राजा शारंगधरू । राज्य करी ॥ ऐसा समधी सर्वोत्तम । तेथ मुकुंद द्विजोत्तम । विवेकसिंधू मनोरम । निर्मिता जाला ॥' ग्रंथ विवेकसिंधू, परमार्थाकाशींचा इंदु, दीनांचा बंधु भूलोकीं अवतरला. आचार्यांचा कित्ता पुढें ठेवला. अद्वैताचा सिद्धान्त मांडला. पाखंड्यांचा वाद खंडिला. अज्ञ जनांना मार्ग दाविला. 'प्रपंचार्शी भिन्नत्व परब्रह्मी नाहीं, सगुण निर्गुण ही एकच दोन्हीहि' अशी लोकांना शिकवण दिली. अज्ञानाची निशा नाशिली. भक्तीची दिशा उजविली. योगाची कळा उमलविली. ज्ञानाची ठिणगी फुलविली. 'परमामृता' दि इतर विपुल ग्रंथरचना केली. मराठींत अक्षय ठेवी ठेविली.

यापरी 'शंकरोक्तीवरी' मुकुंद बोले मराठी वैखरी. 'जयंतपाळ राजासाठीं' खेळ केला, 'ग्रंथरचनेचा गदारोळ' केला. 'परोपकारार्थ' बोल बोलले, आपल्या बोलांनीं 'जग सुखिया' केलें. मुकुंदराजाचें भांडार 'ज्ञानाचें जिव्हार', 'आस्तिक्याचें घर' आणि 'सुखाचें आगर'. मुकुंदराजांची वाणी निर्मळ पाणी, विचारांची सौदामिनी, भावनांची तरंगिणी. कोणींहि वाचावें, विवेकाचें कार्य करावें, अमृताचें पान करावें, मोक्षाचें साधन करावें. वाङ्मयाकाशांतील हा अरुण सदासर्वदा तरुण. याची मोहक कांति, यानें फिटते भ्रांति. अंजनीच्या पोटीं मारुतिराय जन्मले. जन्मतांच सूर्यबिंब ग्रासण्यास धांवले, चिरंजीवित्व पावले. तसें मराठीचें पहिलें काव्य संतांपोटीं जन्मलें, वेदान्तसूर्य आकळण्यास धांवलें, चिरंजीवित्व पावलें. संस्कृत पंडितांनीं कधीं नाहीं पाहिली अशी रीत मुकुंदराजांनीं दाविली. मराठींत ओवी ओवली ती जगलोकांनीं आवडीनें गायिली.

साधूला साधू भेटे, परमार्थाचा पूर लोटे. महाराष्ट्राची काळी त्यानें पिकविली आगळी, ग्रंथरचना वेगळी मराठींत केली. गुरु मच्छिंद्रनाथ,

शिष्य गोरखनाथ, दोघांची जोडी आली, परमार्थाची गोडी लावली. नाथपंथ काढला, योगाभ्यास वाढला. शैली, शृंगी, कथा, झोळी, तनूवर विभूति धारण केली. अलख ठोकली. महाराष्ट्रास आदेश दिला; देश खडबडून जागा झाला.

गोरखानें मराठीकडे पाहिलें, गीत गायिलें. 'गोपीचंद-मैनावती' नित्य त्याची वाणी गाती. 'गोरख-अमर-संवाद' केला, 'गोरखगीत' गाऊन गेला. 'कैसें बोलो पंडीती, देवो कवणें ठायीं' गोरखाचें निरूपण बोधपर होई. 'गंगेचे उदकें स्नान पै कीजें जवाहीर पाखाळितां भीतर केंवि भीजे' अशी कर्मठांची कानउघाडणी केली. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हाच सिद्धान्त आरता परता जनांच्या मनांत ठसवीत होता. गोरखानें दृष्टान्त दिले वाग्ब्रह्म साक्षात् केलें. गोरखाची उपमा सोन्याची प्रतिमा. अशी मराठी माउली वाङ्मयाच्या पुष्पवाटिकेंत फिरली. तेथें एक एक गेंद तिनें आपल्या श्वासानें फुलविला. वेदान्तासारख्या गहन वनांत शिरली आणि आपल्या संचारानें त्याचें उपवन केलें.

सईचा स्वभाव साधासुधा अन् सरळ. मनानें मोकळी फुलाची पाकळी. वायफळ बोलायची नाहीं, हृदय चोरायची नाहीं. आंत एक बाहेर एक असें कांहीं नाहीं. सरळ सांगायचें सरळ वागायचें. मराठ्यांचा भाला सरळ घुसतो, मराठीचा बोल सरळ असतो. हिला लोककल्याणाची आवड भारी, सदा झिजते चंदनापरी. मात्र रूपासाठीं धडपडायची नाहीं, रसासाठीं रुसायची नाहीं. सहजचें लाभलेलें रूप हिला आपरून होतें; रस तर हात जोडून पुढें उभा राहतो. अंगांत कांहीं निराळाच आवेश; सगळ्या विषयांत सुलभ प्रवेश. त्यांत सुगम दुर्गम पाहायची नाहीं, मागें कधीं रहायची नाहीं. अवघड म्हणून अडायची नाहीं, सनघड म्हणून हुरळायची नाहीं. दुसऱ्यावर छाप पाडावी, आपलेंसें करून घ्यावें, हा तर हिच्या हातचा मळ. हिचें हृदय जातिवंत आईचें. आपल्या लेंकरांप्रमाणेंच भगिनीभाषांच्या लेंकरांवर ही माया करते; त्यांना आपलेंसें करते. हिच्या या स्वभावामुळेंच कित्येक कानडी,

तेलंगी लेंकरांना हिचा लळा लागला. त्यांनीं हिचा घोळ धरला, हिचा मार्ग अनुसरला.

सईचा स्वभाव साधा तशा आवडीहि साध्याच. ही पंचपक्वान्नें मागायची नाहीं, भाजीभाकर टाकायची नाहीं. हुरड्यावर राहिली तरी जिवाचा धुरडा करून घ्यायची नाहीं. हिला दागिन्यांचा सोस नाहीं, पण लंकेची पार्वती राहणेंहि आवडत नाहीं. एकदोन अलंकार नित्य लेते आणि अर्थाचें मंगळसूत्र मात्र गळाभर असतें. हिला विलासांची फारशी आवड नाहीं, पण त्यांचं वावडंहि नाहीं. हिला धाडसाची फार आवड पण खांदीं वाहते नित्य जगहिताची कावड. एवढें कर्तृत्व पण ही कधीं अहंकाराच्या वाऱ्याला उभी रहात नाहीं, दुराभिमानाच्या दारावरून जात नाहीं. अंगीं नम्रता तर अगदीं लव्हाळीच्या काकासारखी. हिची चाल थेट मराठ-मोळ्याची. जपून चालायची, पदरांतून पाहायची, मर्यादेनें बोलायची, अर्थाला सोलायची. वागणूक जरी लवून असली तरी हात लावून पाहा म्हणजे नागिणीसारखी उसळेल. उणं सहन करायची नाहीं; दुणं द्यायला भ्यायची नाहीं. स्वाभिमान खच्चून भरला आहे. पण उगीच कोणाची आगळिक करायची नाहीं, वाऱ्याशीं भांडायची नाहीं. मराठीचं बोलणं खडीसाखरेसारखं गोड, मराठी आपल्या जिवाची जोड. मराठी भाषा मंजुळ मैना. हिची सर कोणालाच येईना.

जा, आतां निजा बरं बाळांनो; मी उद्यां पुढली कहाणी सांगेन.

* * *

६. महानुभावी वाङ्मय

या रे, तान्ह्या वासरांनो, हरण्या-पाडसांनो, मी आज तुम्हांला महानुभावी पंथाची आणि महानुभावी वाङ्मयाची माहिती सांगत्यें. ऐका.

वसंताचे वारे वाहूं लागले. 'हरळा' चे हिरे होऊं लागले. लव्हाळे लवूं लागले. पक्षी गाऊं लागले. रानफुलें हंसूं लागलीं. वनदेवता डोलूं लागल्या. वन्य लता बोलूं लागल्या. गोविंद प्रभु महायोगी, तपश्चर्या नांवाजोगी. चक्रधर दुरून आले, गोविंद प्रभूचीं धरलीं पावलें. गुंडम राऊळ पावले, परब्रह्म दावलें. चक्रधरांनीं ऋद्धपुरीं मठ स्थापिला. महाराष्ट्रांत महानुभाव पंथ पसरिला. या पंथाचीं अनेक नांवें. 'अच्युत' म्हणून कोणी म्हणती, 'जयकृष्णीय' कोणी वदती, 'महात्मा' नांवानें अनेक ओळखती. साधारण जनसारे 'मानभाव' म्हणती.

दत्ता-कृष्णाची भक्ति हीच पंथाची सर्व शक्ति. तत्त्वज्ञानांत द्वैताचें प्रतिपादन केलें, भक्ति-वैराग्याचें संपादन केलें, 'भगवद्गीता' आणि 'भागवत' हे मुख्य ग्रंथ मानिले. अज्ञ अभिज्ञ जन आपल्या पंथांत आणिले. स्त्री-वैश्य-शूद्रांना मोक्षमार्ग दाखविला. सर्वांना सारखाच संन्यासाचा अधिकार दिला. गुरुकृपेची गंगा दुथडी वाहूं लागली. कांठच्या लोकांच्या उद्धारार्थ वाहूं लागली.

पंथानें मराठीची सेवा मनोभावें केली. उत्तम वाङ्मयाची निर्मिति झाली. चक्रधर स्वामी बोलले तेच त्या मानभावांचे वेद झाले. 'सृष्टीमध्यें

कव्हणे करणें मुचिजेना एके परमेश्वरेंव्हीण'. मोक्षार्थ झटा नाना उपायीं परी परमेश्वरी कृपेवांचून मोक्ष नाहीं. 'तोचि परमेश्वरु निर्वैषो निराकारु' असे. परमेश्वराला रंग नाहीं, रूप नाहीं, आकार नाहीं, विकार नाहीं. 'पर कृपावशें सावेवो साकारु होए, अवतरे आपलें सन्निधान दे, तें दास्य-मोचक'. पण तो कृपावश होतो, रंगरूप घेतो, अवतार धरतो, सान्निध्य देतो. त्यानें बंधनांतून भक्त मुक्त होतो. चक्रधरांचें म्हणणें, एका परमेश्वरावांचून कोणी तारक नाहीं, त्याचें ज्ञान करून घ्यावें; मोक्ष मिळवावा, विषयवासना सोडून द्यावी. भक्तांची कांस धरावी. त्यानें निवृत्तीचा मार्ग उजळतो, प्रवृत्तीचा नायनाट होतो.

चक्रधर बोलती महींद्रभट झेलती. चक्रधरांनीं लीला केल्या, अंधारांत दिशा उजळल्या. तान्हेल्यांसाठीं पाणपोई घातली. भक्तजन उद्धरायची सोय केली. महींद्रभटांनीं सर्व लीला लिहून काढल्या, जपून संग्रहीत केल्या. त्या सर्वांचा ग्रंथ केला, गद्याचा आदर्श दिला. असें तें 'लीला-चरित्र' वाचून पाहावें. त्यांत तत्कालीन मराठीचें रूप पाहावें.

केशवराज सूरी त्याची कांहीं वेगळीच माधुरी. महींद्रभटानें चक्रधरांच्या उक्ति लिहून काढल्या. त्यांतून त्यानें कांहीं निवडून काढल्या. त्याचा 'सिद्धान्त-सूत्र-पाठ' केला. हाच मानभावांचा आदि ग्रंथ. हाच त्यांचा वेदोग्रंथ, तेजानें उजळी सारा पंथ. केशवराजानें आणखी एक ग्रंथ लिहिला. 'मूर्तिप्रकाश' नांवानें प्रसिद्धि पावला. यांत चक्रधराचें रूप पाहावें गुण गावेत. ग्रंथ निका झाला, वैराग्याचा सखा लाभला. साहित्याचा सागर उचंबळला, वसंताचा परिमळ दरवळला.

पंडितांची प्रवृत्ति सगळीकडेच सारखी. केशवराजानेंहि संस्कृतमध्यें ग्रंथरचनेचा आग्रह धरला; पण नागदेवाचार्यांनीं त्याला वेळींच आळा घातला. 'नको गाः केसवदेयाः येणें माझिये स्वामीचा सामान्यू परिवारू नागवैल कीः' केशवराज वळले. त्यांनीं मराठींतच सर्व ग्रंथ रचिले.

भास्करभट्ट बोरीकर ज्यांना पंथांत कवीश्वर म्हणती ते सुंदर काव्य रचिते झाले. भानुभटास 'मोहांधकारी' 'चरतें मोक्षनिधान' लाधलें करीं. 'शिशुपालवधाची कथा, जे भक्तिरसाचीं था' (सरोवर) त्यांनीं

निर्माण केली. 'वाणितां वनमाळीः शुद्ध सुखाची होए नव्हाळीः कविता भली पाखाळीः सुरंग दिसे'. शिशुपालवध काव्य केलें. भक्तीचें कौतुक पुरविलें. यांत परब्रह्म वानिलें पण शृंगारांत म्हणिलें कोठें 'रत्नें विकिती कवडेनिः आळोआळीया चिंतामणीः' अशा द्वारकेची अलोट संपत्ति प्रकट केली. कोठें 'कामकंटकांचा गजबजाटः तैसा कोकिळांचा कलकलाटः ऐकविला.' कोठें वापु कामाचें पिसेंः झाडां लागलेंः' असा मदनाचा थयथयाट दाखविला. आणि कोठें 'माधवी मंडपाचा शेजारी योगियातें झळंबी कामुलहरीः' अशी योग्यांची कामापुढें उडालेली तारांबळ वर्णिली. 'कोठें दिवाकरांची धाडीः साइलियांतें न मोडीः (परी) कसकसां रगडी अंधकारातेंः' असें वीरांच्या उदात्ततेचें वर्णन केलें. अन् कोठें 'रणभूमीचा घाणा करूनि सरीसाः महाकाळ उस गाळिताए जैसाः' असा वीररस निर्मिला. 'शिशुपालां' त भास्करांनीं शांतरसाचा थाट केला, शृंगाराचा पाट फोडला, भक्तीची लूट केली, हास्याचा हाट मांडला आणि वीराची पाठ थोपटली.

शिशुपाल ग्रंथ पुरा झाला. भावेदेव-व्यासास दाखविला. भावेव्यास बोलले 'भटो हा ग्रंथ निका जालाः' परि निवृत्तांजोगा नव्हेचिः हा शृंगारियं प्रवृत्तांजोगा जालाः'. भानुभट विचार करिती. 'शांतरसु बोलावया प्रवृत्त' होती. पुढें 'एकादशू ग्रंथ' केला. 'उद्धव गीता' नामें प्रसिद्ध झाला. भगवंतानें उद्धवास शुद्ध उपदेश केला. तोच येथें काव्यरूप ल्याला. त्यांत प्रणेयाची पेरणी केली. साहित्याची सौंगण केली. सिद्धान्ताची सुगी झाली. 'भक्ति-ज्ञान-वैराग्य लक्षण' सांगितलें. द्वैताचा सिद्धान्त समर्थिला. 'ब्रह्मासि आणि जिवाःस्वरूप भेद जाणावाः' असा जाव ब्रह्मांतील भेद प्रतिपादिला. यांत शांत–भक्ति–करुण यांची त्रिपथगा आली. तिनें तत्त्वज्ञानाची लता सिंचन केली.

भास्करांची काव्य-कलिका 'मुक्ति-लतेची दूतिका,' 'कैवल्य मंदिरींची पताका झळकतसे.' भास्कराच्या 'ठिकसा बोलां घोस पडेः रसरंगाचे पट्टाळ उघडे" भास्कर कवि 'वाचा रसाळा कळहंसा (आणी) अवकळा' ही 'ही प्रबंध वसंतींचा कोकिळा' गाऊं लागली.

मराठी भाषा रसांत न्हाऊं लागली. विरक्ति वानिता हंसली तशी भक्ति-लता पालवली.

नागदेवाची बहीण, चक्रधरांची शिष्यीण, गोविंद प्रभूच्या 'कृष्ण-विवाहांतील' श्रीकृष्णाची करवली 'महदंबा' जाहली. ती 'धवळे' गाऊं लागली. भक्ति सरिता वाहूं लागली. कृष्णानें रुक्मिणी पर्णिली. महदंबेनें कथा वर्णिली. 'भीमका कुळीं केला रुक्मिणी अवतारू: रूपें लावण्यें तियां जिंतला संवसारू:' राजा-राणींच्या मनांतला हेतु, 'कुमारी लावण्य निधानः इय वरू होय द्वारके नाथु:' पण 'रुक्मिया म्हणे ताता ऐसे केवि कीजेः गौळियां घरीं कैसी रुक्मिणी दीजेः' रुक्मिणीनें 'सावळा श्रीकृष्णु' आठविला, ब्राह्मण बोलावूं पाठविला. 'सदर श्रीकृष्णु झळकीतां देखिन्नलाः' आठे सात्विकु प्रकटलेः रुक्मिणीच्या 'चिंता संभ्रमु जालाः' 'रुक्मिणी भणे प्रिया अंबिका नवासिली' तेथून श्रीकृष्णानें रुक्मिणी हरून नेली. पुढें राजानें कृष्णास रुक्मिणी दिधली. 'वऱ्हाडि या सहित वरु पातैला मंडपाचिया द्वारां; वरमाय वधुमाया वरु ओवाळिला. वसिष्ट भणे सावधानु ब्रह्में साकार मंत्रें पटु फेडिला' असें कृष्ण-रुक्मिणीच्या विवाहांतील अनेक सोहाळे 'महदाईसीं गोवींदरावो धवळीं आइकवीले. महदाईचें धवलें कळे कोवळे तिनें उधळले माणिक-पोवळे.'

चक्रधरांचे शिष्य भावेदेव व्यास, यांचा सदा विरक्तिशीं सहवास. त्यांनीं 'पूजा अवसरा'दि ग्रंथ लिहिले. त्यांत चक्रधरांची दिनचर्या सांगितली. 'नित्य दीनी लीला कव्हणी कव्हणें ठाइं बोले ति कव्हणी ठाइ कव्हनी विशेखु:' असा दिनचर्याक्रम सांगितला, गद्य ग्रंथ निर्मिला.

'धन्य ती गायनी कला' जो सहज आकळीता झाला, तो दामोदर पंडित हिरांचा भार्येनें मंडित. पंथांत शिरला. भयगींत विरला. त्यानें भागवताचें अनुसरण केलें. सुंदर काव्य 'वच्छहरण' केलें. 'नागरी बोलीं स्वच्छ वाणिजेः सकल रसांतें पोखिजे' अशी त्याची कविता झाली. तिनें भक्तीची कांस धरली, साहित्याची पूजा वरिली. रसांची नदी वाहविली, रसिकांचीं शिरें डोलविलीं. पंडितांचा ग्रंथ म्हणजे कदंबाचा सुगंध. पंडितांची कविता तत्त्वशील पतिव्रता.

नरेंद्रादि इतर कवि झाले, 'रुक्मिणी-स्वयंवरा'दि ग्रंथ लिहिले. त्यांनीं पंथाचें नांव केलें, मराठीचें गांव वसविलें. कवितेला हंसविलें, गद्याला गौरविलें. मराठीची सेवा केली, त्यांची कीर्ति आजवर मागें उरली.

जा, आतां निजा बरें बाळांनो; मी उद्यां तुम्हांला पुढली कहाणी सांगेन.

* * *

मराठा ... ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४४५ विः निबंध
क्रमांक ११८८ नोंः दिः १८।१०।५८

७. मराठीचे महाकवि श्रीज्ञानेश्वर

या रे, वरुणा-इंद्रांनो, सूर्या-चंद्रांनो, हरि-गोविंदांनो, मी आज तुम्हांला मराठीच्या महाकवीची कहाणी सांगत्यें. ऐका.

यादवांचें राज्य आलें. माधवानें नवल केलें, मराठीचे पांग फिटले. महाराष्ट्राची सभा भरली. सिंहासनावर मराठीची मूर्ति विराजली. पूर्व-कवींनीं पूजा केली. मराठीची सेवा केली. कोणीं तिला चंदनाची उटी लावली. कोणीं सुगंधी द्रव्यें वाहिलीं. कोणीं वस्त्रापात्रांचे अहेर केले, आपल्या जिवाचें माहेर केलें अन् भावांचे सोहाळे पुरवून घेतले. भक्तांनीं आपली वाग्वीणा तिच्या चरणीं वाहिली. तिच्या आशीर्वादानें आपली शिदोरी बांधली. मराठी भाषा या पूजासाहित्यानें शोभूं लागली. जगाची दृष्टि लोभूं लागली. पण भक्तराज अजून आला नव्हता, म्हणून मराठीचा जीव उबगला होता.

इतक्यांत वसंताचा परिमळ सुटला. उत्साह-सागराचा बांध फुटला. आंब्यास मोहोर आला. कोकिळांला स्वर आला. दशदिशांनीं थाट केला. चहूंकडे घमघमाट सुटला; कवींचा राजा आला. अनाथांचा नाथ आला. मराठीचा कंठमणि आला. वाग्विभवाचा चिंतामणि आला. कवींचा राजा आला. येतांना फार गाजावाजा झाला. मुकुंदराजानें ललकारी दिली, मराठी जनता सावध झाली. भानुभटानें राजाचा मार्ग झाडला, त्यावर गुलाल उधळिला. महदाइसेनें अक्षवण केलें, लिंबलोण

उतरलें. गोपाळ पंडितानें गुण गाइले. सर्वांनीं अंतरिक्षांतून चरणांवर शिर नमविलें, फुलांची वृष्टि केली. सगळे कवि एकाच स्वरांत गर्जना करिती, 'कवींचे राजे येती, पावन होते अवघी धरती'. मराठीचे क्लेश हरती. मराठीची कीर्ति करती. ज्ञानानें नवखंड हे उजळती. सांभाळा, लक्ष द्या. लक्ष द्या. 'जी जी महाराजा यावें कीं जी ज्ञानराजा. मराठीची पूर्णपूजा करा कीं जी निजहातीं.'

पूर्व कवींचा स्वर ऐकिला, मराठीचा कीर आला. ज्ञानारविंद फुललें, भोंवतीं भक्तभृंग झुलले. 'ज्ञानिया'नें मराठीला ऐश्वर्याची कळा दाविली, तिच्या भाग्याची पंढरी केली, उत्कर्षाची परिसीमा गांठली. त्यानें मराठीची पूर्णपूजा केली.

पूजेचा थाटमाट वानूं किती! गजबजाट गाऊं किती! लखलखाट सांगूं किती! मनोबुद्धीचें अंगण विवेकाच्या झाडणीनें झाडलें. त्यावर भक्तीचे सडे घातले. साहित्याच्या रांगोळ्या काढल्या. योगाचे चौघडे झडूं लागले. ज्ञानाच्या दीपमाळा लागल्या. पदांच्या पायघड्या घातल्या. अर्थाच्या अरगजा लावल्या. अन्तःकरणाचें निरांजन केलें. त्यांत 'जिवा-शिवां'ची वात तेवत होती. 'अद्वैता'चा प्रकाश पाडीत होती. 'ज्ञान-विज्ञाना'ची काजळी झाडीत होती. 'सोऽहं' भाव दावीत होती. परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी सर्व वाणी राहिल्या दुरी. तेथें मौनानें स्तवन केलें. ध्यानाचें हवन केलें. वासनेचा कंद छेदला. ब्रह्मींचा आनंद लोटला. लोकोद्धाराचा भाव धरून काव्याचें कमल केलें. त्यांस अभंग-ओव्यांचा आकार दिला. कल्पनांचे पराग केले. आठ रसांच्या पाकळ्या केल्या. शांत रसाची कर्णिका केली. अनुभवाचें अमृत दळादळावर शिंपलें. गुरुकृपेनें कमल अन्तर्बाह्य फुललें. ज्ञानदेवांनीं तें मराठीच्या चरणीं वाहिले. मराठीनें त्यांकडे हंसून पाहिलें. ज्ञानेश्वरांच्या पूजेनें मराठीचें मन भारलें, भाव पुरलें. तिनें त्यांचें काव्यकमल शिरावर धरलें. तें अजूनहि तेथेंच आहे.

अशा राजाची कहाणी मन लावून ऐका. त्याच्या काव्याचा आस्वाद आतृप्त चाखा. त्याच्या उपदेशानें जोडावा वैकुंठींचा सखा.

गोदावरीच्या कांठीं आपेगांव आहे. तेथें विठ्ठलपंत कुळकर्णी नामें गृहस्थ होते. त्यांनीं बायकोस न पुसतां संन्यास घेतला, पण गुरूंच्या आज्ञेनें त्यांना पुन्हा संसार करावा लागला. मन, बुद्धि देवापायीं, त्याला संसाराचें बंधन नाहीं. ऐशा शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं. विठ्ठलपंताला चार मुलें झालीं. पहिले निवृत्तिनाथ जन्मले. दुसरे ज्ञानदेव अवतरले. तिसरे सोपानदेव झाले. चौथी मुक्ताबाई झाली. हीं कांहीं साधीं मुलें नव्हतीं. यांच्या रूपानें चारी मुक्ति जन्म घेती; चारी योग लगबग येती, चारी पुरुषार्थ देह धरती, त्रिखंड आपली भरती कीर्ति. पण जगाला हा भाव कळला नाहीं. दगडाचा दोर वळला नाहीं. आळशावर गंगा आली परी तो तिला बळेंची डावली. अशी तत्कालीन समाजाची वागणूक झाली. समाजानें त्यांची जाचणूक केली. जो तो म्हणे हीं संन्याशाचीं मुलें. यांना जात नाहीं यांना गोत नाहीं. यांना वर्ण नाहीं, यांना धर्म नाहीं. वाळींत घाला. वाळींत घाला. ब्राह्मण कर्मठपणें ठकले, देहबुद्धीनें चकले, चौघा भावंडांना त्यांनीं वाळींत टाकलें. पण जेथें भक्ति हे सरती तेथें जाती न पुरती. परब्रह्मींचे ठसे तेथें जातींना कोण पुसे ? ब्राह्मणांची वाचा वेदांची ऋचा. ब्राह्मणानें लाथ मारली, श्रीविष्णूंनीं हृदयाशीं धरली. ब्राह्मणांचे बोल यांनीं कानांनीं ऐकिले शिरसा वंदिले. हे समाजापासून दूर दूर राहिले. पण ज्ञानदेवें नवल केलें. रेडा खडखड वेद बोले. तेव्हां ब्राह्मणांचीं गात्रें थरारलीं, अहंता विराली. वैराग्याचे कोंब फुटले, निगम-वल्लीचे ताटवे फुलले, भक्तिसरितेचे ओघ दुथडी भरून चालले. हें जेव्हां ब्राह्मणांनीं पाहिलें तेव्हां शुद्धिपत्र लिहिलें. तें चौघांनीं माथां धरिलें. येथून पुढें लोकोद्धाराचें व्रत वरिलें.

गहिनीनाथांनीं निवृत्तीस उपदेश दिला. निवृत्तीनें आपल्या भावंडांस 'प्रेमखूण दिली'. ज्ञानेश्वर साधकाची ती माउली, पिके सारस्वत तिचिया पाउलीं. ज्ञानेश्वर मावली, महाराष्ट्रावर करी कृपेची सांवली. संस्कृत भाषा जगासी कळेना म्हणून ज्ञानेश्वर माउलीस फुटला पान्हा. 'वेदाची सुसेव्यता ते हे जाणा मूर्त गीता'. तिच्या भावार्थाचा विवरू करिती ज्ञानेश्वरू. व्यासांचा मागोवा घेत, भाष्यकारांतें वाट पुसत, मऱ्हाठे बोल रंगें, कवळितां गीतांगें ब्रह्मविद्येचीं अंतरंगें उघडिता

झाला. प्रबंधव्याजें जगातें रक्षिता झाला. देशी आणि संस्कृत वाणी एका भावार्थाच्या सुखासनीं बसविल्या. संस्कृताचीं गहनें तोडिलीं आणि मऱ्हाठिया शब्दसोपानें रचिलीं. मऱ्हाठिया गीतार्थु आला, जगा परमार्थु झाला. 'देशियेचें नागरपण' दाखविलें, 'शांता' हातीं शृंगारानें जिंकविलें. साहित्याला ओव्यांचें लेणें लेवविलें. मराठी भाषेचा अभिमान धरिला. 'मऱ्हाठाचि बोल कौतुकें अमृतातेंहि पैजा जिंके' असा मराठीचा सन्मान केला. मऱ्हाठे बोल समुद्राहून सखोल, अर्थभरित आणि रस-पूरित. त्यांनीं मोक्ष पेरीत जगाला उद्धरीत ते चालले. ज्ञानदेवामुखीं जे जे निगे तें संतांच्या हृदयीं साचचि लागे. तें मनाच्या कानीं ऐकावें, बुद्धीच्या डोळां देखावें, चित्ताचिया सांटोवाटीं घ्यावें.

ज्ञानदेवांनीं गीतेंतील तत्त्व प्रतिपादिलें, साहित्याचें तत्त्व संपादिलें. अध्यात्माचे सिद्धान्त सांगितले, प्रपंचांतील दृष्टान्त दिले. ब्रह्मज्ञानाचें अंतरंग चाखविलें, सृष्टिसौंदर्याचें नवरंग दाखविले. गीतार्थाचें सार चाखविलें, विवेकसिंधूचें तीर दाखविलें. अद्वैताची अमोल वाटली संपदा, कारण 'द्वैत तें नावडें गोविंदा.' एकेवीण दुजें तत्त्व नाहीं सृष्टी 'ब्रह्म सनातन सर्वां घटीं' ऐसें बोलतां सहज मन रंगलें हृदया. एक जाहलें ये हृदयींचें तें हृदयीं घातलें. भुकेल्या जगासाठीं केलें ज्ञानेश्वरीचें भातुकें अन् ओवियांचे ओघ चालती कौतुकें. जें उन्मनियेचें लावण्य, जें तुर्येचें तारुण्य, अनादि जें अगम्य परम तत्त्व तें पाहतां पाहतां दाखविलें. असे गीतेच्या उपवनांत तत्त्वज्ञानाचे निकुंज लावले. सारस्वताचें झाड पालवलें. तें रसभाव फुलीं फुललें. नानार्थ फळभारें फळा आलें.

जा, आतां निजा बरें बाळांनो; मी उद्यां तुम्हांला पुढली कहाणी सांगेन.

* * *

८. मराठीचे महाकवि श्रीज्ञानेश्वर

या रे, वरुणा-इंद्रांनो, सूर्या-चंद्रांनो, हरि-गोविंदांनो, मी आज तुम्हांला ज्ञानेश्वरांची कहाणी पुढें सांगत्यें. ऐका.

ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरींत योग, ज्ञान, कर्म आणि भक्ति या चारी मार्गांचें विवरण केलें अन् जगाच्या दृष्टीवरील मायेचें आवरण दूर केलें. ज्ञानेश्वर परम योगी; पण साधारण जनांना त्यांनीं योगाचा उपदेश केला नाहीं. चारी मार्गांची योग्यता सांगितली; गुरुकिल्ली दाखविली. पण साधारणांसाठीं भक्तीच प्रतिपादिली. योगीयांचा मार्ग निका, परी न आकळे सर्व लोकां. योगियांचा अवघड वाटा, त्यांनीं इहपराला येईल घाटा. प्राणांचा बिकट निरोध, इंद्रियांशीं सदा विरोध. इडा पिंगळा कळायची नाहीं, योगाची भट्टी जुळायची नाहीं. ज्ञानाचेनि प्रकाशें (फिटती) भेराचे कवडसे. पण ज्ञानमार्ग सखोल मोठा, वेदशास्त्रांच्या चोखाळाव्या वाटा तेव्हां तो आढळतो, असा एखादाच तरतो. कर्माचीही गहन गति त्यानें कुंठित होते मति. त्यानें अहंकार जडतो, प्राणी पदोपदीं अडतो. यास्तव भक्तिपरती नाहीं शक्ति. तिनें चारी मुक्ति दासी होती. असा राजमार्ग दाखविला; सारा जनलोक जागविला. हेंच त्यांनीं ' पसायज्ञान ' दिलें. भुकेले जनलोक सेवून तृप्त झाले.

ज्ञानेश्वरांनीं सांगितलें प्रपंच हा परब्रह्मरूप आहे. गृहाश्रमु सांडूं नये. कर्मरेखा ओलांडूं नये. संसार सांडूं नका, देह दंडूं नका. कर्मासक्त

होऊं नका याच मार्गें भेटे सखा. जीं जीं कर्मे घडती हातीं, तीं तीं अर्पावीं भगवंताप्रति. प्रकृतीचा हा धर्म, जनाहातीं करवीं कर्म. मात्र फलाशा धरूं नये, कर्माचा कंटाळा करूं नये. सुष्ट दुष्ट म्हणूं नये. 'आलें असेल जातिस्वभावें तें नित्य करीत असावें.' 'जयाचें जें विहित तें ईश्वराचें मनोगत'. त्यानेंच संसाराचें धरणें फिटतें. तोच जिंकितो कर्मबंधातें.

माया नदी दुस्तर आहे. येथें 'जो जो कीजे तरणोपावी तो तो होय अर्पावो. मोठे मोठे थकती तेथें अज्ञ अपंग किती ! याज्ञिकांची सामुग्री सरली, कर्मठांची गति कुंठली, ज्ञान्यांची शुद्धि हरली आणि योग्यांची तनु भागली. अशी दुस्तर मायानदी पण ती ही परमेश्वराच्या भक्तीनें सहज तरवते. भक्तीचें साधन अगदींच सोपें. भक्तीसाठीं जात आडवी येत नाहीं, वर्ण बाधा करीत नाहीं, आश्रम नको म्हणत नाहीं. ते 'पापयोनीहि' असोत, ते श्रुताधीतहि नसोत, ते वैश्य असोत कीं चांडाल असोत; शूद्र असोत कीं स्त्रिया असोत. देवातें भजतां देवासच मिळतात. त्यांनीं एवढेंच करावें वाचेनें काढावे (प्रभूचे) 'आलाप' दृष्टीनें भोगावें (प्रभूचें) रूप. मनानें करावा प्रभूचा संकल्प. कानीं हरिकथा ऐकावी. 'सर्वांगी' प्रभुसेवा करावी. प्रभूला जाणण्याचा ध्यास धरावा. प्रभूसाठींच जगण्याचा हव्यास करावा. 'क्रियाजात आघवे' देवासी अर्पावें. देवासाठीं यजन करावें, देवासाठीं भजन करावें. फळफूल घ्यावें, भक्तीनें देवास वहावें. वैकुंठीचा राणा 'भावाचा पाहुणा' 'जें जें भेटे भूत तें तें मानावें भगवंत' हाचि भक्तियोग मानावा निश्चित. कृष्ण विष्णु हरि गोविंद या नामाचा नित्य असावा छंद. 'हो कां भलतेणें भावें' परि देवाचें स्मरण करावें. 'जेथें नामघोष बरवा तेथें हारपला हरि गिंवसावा.'

या ग्रंथाच्या निरूपणीं नवरसांचे भरले सागर, उचित रत्नांचे केले आगर आणि भावार्थाचे निफजले गिरिवर. देशियेचीया क्षोणी उघडल्या साहित्य-सोनियाचिया खाणी. येथें भावरूप उठावलें रसवृत्तीचें वडप (वर्षाव) लागले, चातुर्यास पडप (वस्त्र शोभा) जोडलें. विवेकवल्लीची

लावणी झाली. 'प्रमेयांचें उद्यान' पालवलें. संवाद-फळांचे घोस आले. पाखंडांचे दरकुटे मोडले. वाग्वादाचे आव्हांटे (आडवाट) बुजविले. कुतर्कांचीं दुष्ट सावजें नाशिलीं. आणि मव्हाठिचे नगरी ब्रह्मानंदाचा सुकाळ केला.

ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभव, चांगदेवपासष्टी इत्यादि ग्रंथ लिहिले. वर सुंदर अभंगहि रचिले. ज्ञानेश्वरांचें अंतःकरण लोण्याहूनहि मऊ होतें. त्यांना जगाच्या उद्धाराची सारखी तळमळ होती. त्यांनीं अनेक तीर्थांची यात्रा केली, भवरोगपीडितांना चिन्मात्रा दिली. पंढरीची दिंडी काशी-विश्वेश्वराला नेली. द्वारकेच्या राण्याची मुद्रा जगन्नाथाला दिली. त्यांनीं पाहिलें, धर्माला ग्लानि आली. आचारांची हानि झाली. कर्मठपण वाढलें. सदाचरण लोपलें. सत्यावर बाबुळी चढली. ढोंगाला शेंगा आल्या. ब्राह्मणांनीं वाढविला अटपिटा, पंथांच्या फुटल्या बारा वाटा. स्त्री-शूद्रांदिकांचा भरणा मोठा. पण त्यांना वेदाचा अधिकार नव्हता; शास्त्रांचा संस्कार नव्हता. त्यांचा बुद्धिभेद होऊं लागला, सर्वनाश होऊं लागला. त्यांना स्वहिताचार कळेना, मोक्षमार्ग मिळेना. यास्तव ज्ञानेश्वरांनीं त्यांच्या सुखाची सोय केली. भक्तीची द्वाही फिरविली. विठ्ठलाची पताका सर्वत्र मिरविली. संतमेळा गोळा केला. वारकरी पंथाला उजळा दिला. विठ्ठलनामाचा गजर केला. भागवतधर्माचा प्रसार केला. सगळा समाज खडबडून जागा झाला. देवांचें द्वार सर्वांना सताड उघडें केलें. सांवळें 'परब्रह्म' विटेवरी ठेलें. त्याच्या भक्तीनें शूद्रादि पावन झाले. समाजाचें रक्षण झाले, भागवतधर्माचें संवर्धन झालें. 'नामापरतें तत्त्व नाहीं.' हा उपाय सांगितला. 'हरि मुखें म्हणा' हा मंत्र दिला. हेंच त्यांनीं अंगीं आचरिलें, ग्रंथीं विवरिलें आणि अभंगीं गायिलें. 'बापु रखुमादेवीवर' स्वतः पाहिले आणि इतरांना दाविले.

अशा प्रकारें ज्ञानेश्वरांनीं देश, धर्म आणि भाषा या तिन्हींची सेवा केली. ज्ञानेश्वरांनीं काव्य लिहिलें, त्यांत मराठीनें आपलें विराट् स्वरूप प्रकट केलें. ज्ञानेश्वरांची बोली 'अमृताची ओतली' कीं 'प्रेमाची पिऊनि मानली'. तींत 'कारुण्यरसाची वृष्टि' आहे, 'नवया स्नेहाची सृष्टि' आहे. तींत सज्जनाचीं प्रेमलता आहे, सात्त्विकतेची सोज्वलता आहे.

भक्तीचा जिव्हाळा आहे. आनंदाचा सोहळा आहे. अलंकाराचें 'बरेंपण' आहे. वाणीचें खरेंपण आहे. प्रतिभेची विशालता आहे, कोमलता आहे, चित्सूर्याची दीप्ति आहे. भाषेची व्याप्ति आहे, ज्ञानेश्वरांचें रूपक रत्नाचा दीपक. ज्ञानेश्वरांची उपमा निजानंदाची प्रतिमा. ज्ञानेश्वरांची वाणी गंगेचें पाणी. ज्ञानेश्वरांची घडण ब्रह्मगिरीची चढण. ज्ञानियाची पदावलि कल्पलतेची सावली. ज्ञानेश्वरांची ओवी शांतरसाची नवी पालवी. ज्ञानेश्वरांची काव्यवाहिनी चिदाकाशींची चिन्मोहिनी. 'पढविलें पांखरूं ऐसें न बोले, कैसें दैव येथ सुरवाडलें, तें जाणों नये' जयाचे 'नित्य नवे श्वासोच्छ्वासही प्रबंध जाणावे,' त्या ज्ञानराज माउलीचे गुण मीं किती वानावे !

अशी ज्ञानदेवांची कीर्ति पसरली जगतीं. तिची मीं चाखली गोडी सांगितली थोडी. मनोभावें ऐका. तिला लागत नाहीं रुका. जा, आतां निजा बरें बाळांनो; मी तुम्हांला उद्यां दुसरी कहाणी सांगेन.

* * *

९. संत-मेळा

या रे, गुणाच्या गोविंदांनो, चिदाकाशिंच्या चांदांनो, भक्तीच्या कंदांनो, मी आज तुम्हांला ज्ञानेश्वरकालीन संतमंडळींची कहाणी सांगत्यें. ऐका.

ज्ञानदेवांनीं मराठीची पूर्णपूजा केली. मराठी भाषा तुष्ट झाली. वारकरी पंथाची ध्वजा उचलली, महाराष्ट्रभर मिरविली. ज्ञानदेवांभोंवतीं संत-मेळा गोळा झाला. त्यांनीं भक्तीचा सोहळा केला अन् मराठीची तुळशी-मंजिरीची माळ विठ्ठलाच्या गळ्यांत घातली. निवृत्तिनाथ भक्तांच्या लीला पाहून कौतुक पावले. सोपानदेव आले; मोक्षाचा सोपान रचिला. मुक्ताबाई आली, जीवन्मुक्त झाली. नामदेव आले, नामामृत प्याले, आतृप्त धाले, कीर्तनरंगीं रंगले अन् इतरांना रंगविलें. जनी आली, नामदेवाची दासी झाली. तिनें विठाबाई आपलीशी केली. गोरोबा कुंभार आले, त्यांनीं भक्तीचे आवे लुटविले. कंदुरपाबळचे कान्हू पाठक आले, त्यांनीं पूजा-पाठ केले. सेना न्हावी आले, त्यांनीं मनो-बुद्धीच्या बुधलींतून भावाचें तेल ओतलें, भक्तीचा दीप पाजळला अन् विवेकाच्या दर्पणांत विठ्ठलरूप पाहिलें. नरहरि सोनार आले, त्यांनीं वैराग्याच्या भट्टींत द्वैताचें हिणकस जाळलें. अद्वैताच्या सोन्याचा कडदोरा केला, त्याला मराठीचा उजळा दिला अन् विठ्ठलाच्या कमरेस बांधला. अरणभेंडीचा सांवता माळी आला, त्यानें भक्तीचें पानफूल

पांडुरंगास वाहिलें. जगमित्र नागा आला, निजभक्तीनें जगाचा मित्र झाला. वारींहून जागा आला, त्यानें परमानंद लुटला. मंगळवेढ्याचा चोखा आला, जिवाभावाचा सखा झाला. त्यानें मंगळ-अमंगळाचा वेढा फोडला; पंढरीचा हुडा पाहिला; आपला प्रेमळ भाव पांडुरंगास वाहिला.

पंढरीच्या भक्तांत जातीचें वावडें नव्हतें; स्त्रीपुरुषांचा भेद नव्हता. सर्वांची जात पंढरी, गीत पंढरी, अन् दैवत विठोबा. सर्वांनीं 'वाळवंटीं चंद्रभागेच्या कांठीं डाव मांडिला; विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला.' तेथें प्रेमाचा सागर फुटला भक्तीचा मकरंद सुटला. हरिनामाचा गजर दशदिशांत भरला. पंढरपूर नगर भूवरील वैकुंठ झालें. सर्वांनीं भक्तीचा प्रसाद पोटभर खाल्ला अन् मराठीचा ढेकर दिला. भागवत-धर्माची गुढी उभारली अन् मराठी वाङ्मयाची गोडी जनतेस लावली. महाराष्ट्रास मराठींतून शिकवण दिली.

निवृत्तींनीं 'अवघ्यारूपी अवघाचि गोविंदु पाहिला;' अन् अभंगीं गायिला. योग आणि भक्तीची गोडी चाखिली, 'सर्वांभूतीं भजन करावें' ही शिकवण दिली. 'रामनामकथा आरंभाव्या' हा जनलोकांस धडा दिला अन् त्र्यंबकेश्वरीं ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं देह ठेविला.

सोपानदेव 'हरिविणें वितंड न बोले कदाकाळीं.' त्यांनीं 'वैकुंठीची वाट पंढरी' पाहिली; आणि आपल्या अभंगांतून 'हाच मार्ग सोपा उघड जनासी' सांगितला.

मुक्ताबाईनें ज्ञानेश्वरापाशीं लाड घातले अन् जगदुद्धाराचें दान मागितलें. 'तुम्ही तरूनि विश्व तारा ताटी उघडा ज्ञानेश्वरा' अशी त्यांची मनधरणी केली; जगदुद्धाराची सरणी सांगितली. ताटीवरले सुंदर अन् प्रेमळ अभंग रचिले; मराठीच्या भांडारांत हिरे, लाल भरले. संतांच्या मंडळांत तिनें ओवी गायिली. ती ऐकून मराठी भाषा पल्लवित झाली. 'पहिली माझी ओवी, परतूनी पाहिलें, दृष्टीनें देखिलें, निजरूप' म्हणतांच संत मंडळी समाधिस्थ झाली; मराठी भाषा सद्गदित झाली. चहूंकडे शांतीचें साम्राज्य पसरलें; वर भक्तीचें चांदणें फुललें. मुक्ताबाईनें गीत गायिलें, मराठीनें अन्तरंगांत पाहिलें. मुक्ताबाईचें बोलणें पारिजाताचें फुलणें.

चांगदेव महायोगी, चौदाशें वर्षें आयुष्य भोगी. त्यानें मृत्यूला टाळा दिला; पण अंतरंगीं तो कोराच राहिला. मुक्ताबाईनें त्याला आत्मज्ञान दिलें, परब्रह्मीं विलीन केलें. त्यानेंहि योगभक्तिपर अभंग रचिले आणि तत्त्वसार ग्रंथ लिहून योगाचें रहस्य प्रकट केलें.

कयाधूनें भक्त प्रह्लादाला विष पाजलें, त्यामुळें तिचें मन भाजलें. पश्चात्तापानें तिनें काया धुतली. भूलोकावर कयाधू नदी झाली; अमृताची सरिता वाहूं लागली, क्याड नांवानें प्रसिद्ध झाली. तिच्या तीरीं नडसी गांव वसलें. तेथें दामाशेट शिंपी संसार करूं लागले. त्यांच्या पोटीं भक्त नामदेव जन्मले. क्याडेचें पाणी साखरेवाणी, वाट-माऱ्याचा झाला भक्तशिरोमणि. 'संपदा सोहळा नावडे मनाला' तो विठोबाच्या गांवा धांवोनि गेला. त्यानें 'चरणांवरी लोळणी घातली" 'पंचहि प्राणांचे दीप उजळिले' अन् 'सुंदर श्रीमुख ओवाळिलें.', 'प्रेमपिसें भरलें अंगीं' अन् 'नामा नाचे गीतसंगें रंगीं.' नामदेवांचा 'पाहून भोळा भाव त्यांना प्रसन्न झाले पंढरीराव.' नामदेवानें 'अवघ्या भावें एक विठ्ठल धरला' 'अन् अवघा संसार सुखाचा केला.' नाम-देवानें 'सुखाचा सुरतरु' खेचर सदगुरु केला. त्यानें नामदेवास स्वरूप साक्षात्कारू दाखविला. गोरोबांनीं थापटीनें पाहिलेलें कच्चें मडकें भाजून निघालें; पांडुरंगाचे 'कृपेचें पोसणें' झालें. 'नाम्यापुढें मज दुजें नावडे' असें पांडुरंगास वाटावयाचें आणि 'चित्त पांडुरंगीं नामयाचें' असायचें असें देवभक्तांचें ऐक्य होतें.

नामदेवानें अत्यंत प्रेमळ अभंग रचले. कधीं त्यांत 'डोळुले शिणले पाहतां वाटुली' म्हणून देवाचा धांवा करावा; तर कधीं 'आम्ही शरणागतीं केलासे सरता, एरव्हीं अनंता कोण पुसे' म्हणून देवावर रुसावें. कधीं 'घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार' म्हणून देवाचा उणेपणा काढावा; तर कधीं 'तूं माझी माऊली मी तुझी तान्हुली' म्हणून लाडीकपणें लाड घालावेत. कधीं 'किती तुला देवा येऊं काकुळती' म्हणून पिळवटलेल्या अन्तःकरणानें विनवणी करावी; तर कधीं 'सर सर परता अगुणा गोपाळा' देवावर त्रागा करावा. त्यांनीं अद्वैत भक्तीचे गोडवे गायिले; सगुण भक्तीचें सौख्य स्वतः सेविलें,

सकलांना चाखविलें. त्यांनीं 'भोगावर पाषाण' घातला. ठायीं ठायीं मोक्ष निर्माण केला. 'सर्वांभूतीं समदृष्टी हेचि भक्ति गोड मोठी' म्हणून भक्तीपुढें मोक्ष तुच्छ मानिला आणि 'नामापरता मंत्र नाहीं' असा सर्वजणांस उपदेश केला.

नामदेवांच्या वाणींत अन्तःकरणाचे कढ आहेत, द्राक्षांचे घड आहेत, भक्ताची आर्तता आहे, भक्तीची पूर्तता आहे, लोण्याची मृदुता आहे, रविकिरणांची शुद्धता आहे, शरच्चंद्राची शीतलता आहे आणि गंगेची पावनता आहे. नामदेवाचे अभंग भक्तिसरितेवरील तरंग. शीतळ मलयानिळ पदरांतून गाळतां येत नाहीं. पुष्पांच्या परिमळाची माळ गुंफतां येत नाहीं. श्रावणाची झड चाळणींत धरतां येत नाहीं. नामदेवाच्या अभंगाची गोडी शब्दांनीं सांगतां येत नाहीं. ते ज्यानें त्यानें वाचून पाहावे, समाधान पावावें.

गंगाखेडीं गोदातीरीं जन्म झाला, जनाबाईनें गोदावरीचा कुसवा पावन केला. नामदेवाची दासी जनी, विठ्ठल तिच्या ध्यानींमनीं. भक्त नामदेव आणि दासी जनी, नेत्रांतील बाहुली आणि नेत्रावरील पापणी. नामयाचें ठेवणें जनीस लाधलें, विटेवरी धन सांपडलें. नामदेवा घरीं जनीनें दळण दळावें, पांडुरंगानें जात्यांत वरणें घालावें. जनीनें कांडण कांडावें, विठ्ठलानें उखळांत घाणा घालावा. जनीनें गाणें गावें, माणूस पांडुरंगानें अवचित साद घालावा. देवांनीं अशा प्रकारें जनी-संगें काम करावें, तिचे श्रम हलके करावे. जनाबाईनें अभंग गायिले, त्यांतून भक्तीचें पूर वाहिले. तिनें योगाचा अनुभव चाखविला, सगुण प्रीतीचा महिमा दाखविला. जनीचे अभंग स्वतः लिहितो रमारंग. तिनें हरिश्चंद्राख्यान, थालीपाक इ. आख्यानें रचिलीं. तीं अत्यंत गोड जाहलीं. जनीनें ओव्या गायिल्या, पांडुरंगास वाहिल्या. यांतून पांडुरंगास पाहिलें, पांडुरंगास वाहिलें 'पहिली माझी ओवीन जगत्रा गाईन सर्वत्र पांडुरंग.' जनाबाईचें गीत, मृदु नवनीत. जनीचा घाट, मधांचा पाट. जनीचें बोलणें जाईजुईचें फुलणें. जनीचा अभंग सज्जनांचें अंतरंग.

'आनंदी आनंद गिळोनी राहिला, गोरोबा कुंभार जीवन्मुक्त झाला.' यांनींहि अभंगरचना केली, भक्तीची शिकवण दिली. गोरोबाच्या वाणीला भक्तीचा पूर लोटला. त्यांच्या काव्यसरितेचा ओघ विठ्ठलसागरीं आटला. कान्हू पाठकांनीं 'गीतासार' ग्रंथ रचिला. भक्तीचा पंथ अनुसरला. सेना न्हाव्यानें सुंदर अभंग रचले; कृष्णभक्ति आणि सत्संगति वर्णिली. 'आपुलालें काम करा, मुखीं हरिनाम धरा' हा उपदेश केला. नरहरि सोनारानें नामाचा व्यवहार केला, अभंगांचा लहानसा नग घडला, पांडुरंगाला अर्पण केला.

सांवता माळ्यानें मराठी वाङ्मयांत भक्तीचा मळा पिकविला. 'कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी' असें परब्रह्म त्यानें सर्वत्र पाहिलें. 'नामाच्या बळें कळिकाळ जिंकिला' 'वैकुंठीचा देव कीर्तनीं आणिला' आणि सर्वांना दाखविला. 'नागा' आणि 'जोगा' यांनींहि परब्रह्म पाहिलें, अभंगीं गायिलें. 'नागा'नें तर अद्वैताचें प्रतिपादन केलें. पुराणांतील सिद्धान्त समजावून दिले. 'जोगा'चे अभंग वाचा, त्याच्या प्रेमाची गोडी चाखा.

'यातीहीन चोखामेळा परि त्यासी भक्तीचा कळवळा.' 'चोखामेळा संत भला तेणें देव भुलविला.' 'हरिकीर्तनाची दाटी झाली, तेथें चोखा मिठी घाली'. त्यानें विवेकदर्पण या नांवाचें एक प्रकरण लिहिलें. चोखोबानें अभंग केले, भक्तिमुनींनीं त्या तीर्थांत स्नान केलें. 'देव भावाचा भुकेला' असा त्यानें उपदेश केला.

याप्रकारें सर्व संतांनीं भक्तिमार्गाचा प्रसार केला. जनांचा उद्धार केला. अभंगरचना केली. मराठीची सेवा केली. जा, आतां निजा बरें बाळांनो; मी उद्यां तुम्हांला दुसरी कहाणी सांगेन.

* * *

१०. ज्ञानेश्वरांनंतरचे कवि

या रे रघु-राघवांनो, यदु-यादवांनो, मधु-माधवांनो, मी आज तुम्हांला ज्ञानेश्वरांनंतरच्या मराठीची कहाणी सांगत्यें. ऐका.

आदिनाथांनीं योग दिला. नवनाथांनीं त्याचा प्रसार केला. ज्ञानेश्वर-कालीं नाथांचा पंथ सर्व महाराष्ट्रभर पसरला. त्यांनीं योगाचा अभ्यास केला, वाङ्मयांत विहार केला. ज्ञानेश्वरांचे शिष्य 'सत्यामलनाथ' यांनीं 'सिद्धांतरहस्य' ग्रंथ केला. त्यांनीं 'ग्रंथांच्या पात्रांत' ठेवला. 'सोलीव शास्त्रार्थ' त्यावर अनुभवसिद्ध 'शुद्ध आत्मरसाचें' सिंचन केलें. जन-लोकांनीं त्यांचें आदरानें सेवन केलें. त्यांनीं 'वेदान्तवनिंचीं फुलें वेंचिलीं'; दहा प्रकरणांचे दहा हार केले; 'प्रेमाच्या सूत्रांत गुंफिले' आणि ज्ञानेश्वरांस अर्पिले. ग्रंथ अध्यात्माचा आदर्श झाला. त्यांत योगाला निकष लाभला आणि भक्तीचा उत्कर्ष झाला. त्यांचीं वर्णनें रसाळ असून ओवी धांवती आहे; भाषा सुलभ असून प्रसादानें परि-पूर्ण आहे.

बराच काळ अज्ञात राहिला; प्रयत्नाच्या पर्जन्यानें काव्याचा कोंभ उदेला; त्याचा 'चोभा' कवि झाला. यानें 'उषाहरण' काव्य लिहिलें. आपल्या प्रतिभेचे उन्मेष दाविले. याची प्रतिभा 'नेसली क्षीरोदकु' (शुभ्र) सेला', 'मग ते निघाली झडझडा'. बाणासुराचें कन्यारत्नु 'उषा पढिये जीवु प्राणु'. तिला पुरुषाचें नांव माहीत नाहीं. वारा पुरुष म्हणून

त्याचाहि तेथें प्रवेश नाहीं. मग ' मरण बांधौनी पालवीं, कवण रीगैल तीये ठाई ? ' अशी ती बाणानें ' जतन केली '. ' प्रधानकन्या चित्ररेषा (खा) तीयेली नीरोवीली '. पण स्वप्नांत पाहिलेल्या अनिरुद्धासाठीं ' उषा ' झाली अशान्त. चित्ररेषा म्हणे त्याला ' गिवसुनी आनीन निश्चांत '. तिनें ' चित्र लीहावेयाची आइती केली ', अनिरुद्धाची मूर्ति प्रकट केली. अनिरुद्ध तेथेंच राहूं लागला, बाणासुरास वृत्तान्त कळला. त्यानें ' भवता आवारू वेढिला '. ' बाहोरी सातवा द्वारीं होती दारवठेकारी ' तिनें हें उषेस कळविलें. ' दोषे (दोघे) षेळतें (खेळते) होती सारी, फासे होते उषेकरी ' ' ते गळीनले हातोनिया ' अन् ' ती आलुकी गळेया झोंबीनली ? ' ' काइ करीन प्राणेस्वरा ' म्हणून घाबरी झाली. त्यानें आश्वासिलें रडूं नकोस वेल्हाळे ' जात असे डोळांचें काजळ ' ओले होत असे वकेस्थळ (वक्षस्थळ). अनिरुद्धानें युद्ध केलें; पण बाणासुरानें त्यास बद्ध केलें. बाणासुर रागानें उषेला मारण्यास आला; पण तिला पाहून ' आंगीं रोमांचळ उठीलें । घर्ग (खड्ग) पडिले हातौनु '. उषा बोलली ताता, ' उधरीन तुझें कुळ जाईन भ्रतारा सरीसी '.

इकडे नारदांच्या सांगण्यावरून यादव युद्धास निघाले. ' देवें आस्फुरिला सघु (शंख) गर्जिन्नला ब्रह्मलोकु '. ' अंबर गर्जत निसाणी, जाली पलाणा वालाणी, थरारीत आहे मेदिनी '. असें यादवांचें सैन्य निघालें. त्यानें ' पाहातीये पाहारी (पाहाटेच्यां प्रहरीं) भंवती वेढिली नगरी. ' तेथें श्रीकृष्णानें बाणासुराचा गर्व हरिला अन् उषेनें अनिरुद्ध वरिला. ' येर येरा क्षेम जालें, तेणें आनंदें गगन भरलें.

' उषाहरण ' काव्य भलें. त्यांत रसांचे झरे वाहिले. कथावेलीवर वर्णनांचे भरघोस लागले. या काव्यांत भक्तीची कळी खुलली वत्सलतेला पान्हा फुटला, श्रृंगाराचा सौरभ लुटला अन् वीराचा रथ घडघडाट चालला. चोभाची वाणी चतुर सुगरिणी, रसांच्या रांधणीं धाली धरणी. चोभाची कविता, कोमल कान्ता, भुलवी झुलवी चालतां बोलतां.

वडवाळ नागेशाचा शिष्य भला, ' अज्ञाना 'नें जगाला ज्ञानाचा लाभ दिला. त्यानें ' वरदनागेश ' ग्रंथ केला. वेदान्ताचा विवरु केला. ग्रंथ सोपा

सरळ झाला. त्यानें 'कालज्ञान', 'गुरु-शिष्य-संवाद', 'पंचीकरण प्रमेय' इ. स्फुट प्रकरणेंहि रचिलीं अन् वेदान्ताची वात झाडून स्वच्छ केली.

पैठणांत पूर्वी 'बहिरंभट' नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याचें सहा शास्त्रांचें अध्ययन होतें. त्याला वेदांत प्रावीण्य होतें. घरांत अग्निहोत्र होतें आणि मोठाले पंडितहि त्याचे छात्र होते. पुढें त्यानें संसाराचा त्याग केला. विरक्तीचा संग धरला. अध्यात्मज्ञानाचा ध्यास लागला. त्याला बडवाळचा सिद्ध नागनाथ गुरु भेटला. गुरूची कृपा झाली. त्याला आत्मज्ञानाची खूण पटली. भागवताच्या दशमस्कंधावर त्यानें टीका लिहिली. तिची पाऊण लाख ओवी झाली. ती टीका 'भैरवी' हें नांव ल्याली. 'दशमां'त जें परब्रह्म अवतरलें त्या 'पूर्णास' यानें मराठीचें लेणें लेवविलें.' 'चाला गे चाला गे' म्हणून ओविया-गौळणी गोळा केल्या. 'पाहया यश्वदेचें निधान' त्या नेल्या. असा बहिरा पिसा जातवेद झाला. त्यानें जनांस कृष्णभक्तीचा घुटका पाजला अन् चटका लावला. त्याच्या कवितेवर काळाची 'जन्ही बुंधी', तन्ही तिचे 'आवेव प्रगट दिसती' त्याची ओवी रसाळ झाली. भक्तीची भूषा ल्याली.

या काळांत गद्याचीहि थोडी रचना झाली; पण ती बहुतेक काळाच्या ओघांत वाहून गेली. गद्याची गिरा वाहता वारा. तो ओंजळींत धरतां येत नाहीं. त्याचा काव्याचा मोहक घोस करतां येत नाहीं. गद्याचा आपय नित्याचा ऐहिक विषय. संतांना विषयाची गोडी नाहीं, म्हणून त्यांची गद्यांत रचना झाली नाहीं. गद्याच्या गायरानांत भक्तीची वेल वाढायची नाहीं, म्हणून त्यांनीं अभंग-ओव्यांचें कुंपण घातलें अन् भक्तीचे मळे पिकविले. गद्याचा घट कच्च्या मातीचा, आंतून अध्यात्माचें जल झिरपून जाणार अन् क्षणभंगुर घट भंगून जाणार. गद्याची भाषा उगवती उषा. ती नित्य नवे रंग दाखविणार, नित्य नवें रूप घेणार. तिला अध्यात्माचा सूर्य कसा गवसणार? गद्याची रचना फाटकी झोळी, पद्याची रचना उंसाची मोळी असेंहि त्यांना वाटलें असेल; म्हणून गद्यांत रचना झाली नसेल. मागून आली तीच पुढें

ढकलली; अशी संस्कृतची सरणी स्वीकारली असेल. पद्यांत रचना केली असेल. होय न होय म्हणतां येत नाहीं; पण गद्याकडे लक्ष थोडें हें मात्र नाकारतां येत नाहीं.

या काळच्या गद्याचा अवशेष असें एक भाषांतरित 'पंचतंत्र' उरलें; पण त्याच्या कर्त्याचें नांव विस्मृतींत विरलें. राजानें 'विष्णुशर्मा नामें ब्राह्मण बोलाविला : तयाचे सांभाळि तिघे पुत्र केले. हे माझे पुत्र जाले तरि हे पढवा आणि राज्यायोग्य करा यैसें सांधितलें: विष्णुशर्मा राजपुत्रांसि नीतिशास्त्र पंचोपाख्यान सांघे: कधीं त्यानें 'चित्ररथ' राजाच्या सरोवरांतील सोन्याचें 'पिस' देणाऱ्या हंसांची गोष्ट सांगितली आणि 'शरणागतार्थ मारु पाहिजे' तरी अवघाचि नाशु होये, हें तत्त्व पटवून दिलें; तर कधीं 'सातूचें पीठ खाय' अशा 'स्वभावकृपणु' ब्राह्मणाची गोष्ट सांगितली आणि 'अनागत चिंती' त्यास असें फळ मिळतें हें दाखवून दिलें. निरनिराळ्या गोष्टी सांगितल्या अन् 'राजानें कोणाचा विश्वासु न करावा' हें आणि दुसरीं सुंदर तत्त्वें पटविलीं. 'तेणें ते नीतिवंत राज्यायोग्य जाहाले'. पंचतंत्राची भाषा, जिवंत झरा. काळ्या भुईंत मंजुळ गातो. विकट खडक फोडीत जातो.

या काळांत महानुभावांनींहि ग्रंथ लिहिले; पण ते पंथांतच राहिले. त्यांनीं सगळ सुंदरी, पारमांडल्य या संकेत लिप्या काढल्या. आपापल्या 'आम्नायां' पुढें सीमारेषा ओढल्या. पंथांतील आम्नायांसहि एकाचें सांकेतिक वाङ्मय दुसऱ्यास पारखें झालें; त्या सर्वांचें वाङ्मय पंथेतरांस पारखें झालें.

विश्वनाथ बाळापूरकरानें 'ज्ञानप्रबोध' केला. 'गीताची भिंती' करून तीवर 'ज्ञानचित्र पाडिलें.' आंत द्वैताचे रंग भरले. 'पर कोरडिया जाणिवा चाड नाहीं देवदेवा,' म्हणून त्यानें 'ग्रंथसुवर्णाचें ताट' घेतलें. आंत 'रसाची वाटी' ठेविली. 'प्रेमपूर्वक देवां आरोगण' केलें. भक्तीचा विडा केला, 'साहित्यरत्नांत घोळला.' त्याला सिद्धान्त कर्पुराचा वास दिला. 'पोखल्या प्रेमभावा'नें तो परमेश्वरांस अर्पिला. त्यानें

'ज्ञानचंद्रिका' नांवाचा गद्य ग्रंथहि लिहिला. विश्वनाथाची वाणी वाऱ्याची झुळुक. सहज यायची, चित्ताला क्षणभर शांति द्यायची.

मुनिव्यासानें 'स्थानपोथी' लिहिली. न्यायव्यासानें 'हेतुस्थळ' लिहिला. दोघांनींहि गद्याचा मार्ग अनुसरला. न्यायव्यासानें 'स्मृति-वृद्धाचार, सिद्धान्तस्थळ' इ. ग्रंथ लिहिले. पंथाच्या वाङ्मयांत भर घातली.

बहाळें नारोव्यासानें 'ऋद्धपुरवर्णन' केलें. त्यांत अन्तःकरणाचें कढ ओतले. गुरुभक्तीची कडी केली. रसांची सरिता वाहविली. तीवर भावनांचे कल्लोळ उठले. त्यांत भाषेचें कोड पुरलें. त्यानें ऋद्धपुराची शींव पाहिली 'तेव्हां सासुरवासें शीणली तिथें भेटे जेवि माउली' तशी त्याची स्थिति जाहली. त्यानें 'त्याचेडतें परक्रीक्ष' मठांत पाहिलें, त्याचें त्रिविध ताप निवले. 'अवलोकितां श्रीमूर्ति न लागतीं नेत्रांचीं पार्ती,' जणों 'डोळे वाट दाखविती परसुखाची.' त्यानें आर्ततेनें टाहो फोडला, 'परात्परतरु' कृपेनें फुलला. ग्रंथ पंथीयांनीं आदरिला. तो साती ग्रंथांतील एक झाला. नारोव्यासाची कविता भक्तीची दुहिता. माहेरीं आली, ओवी गाऊं लागली.

भीष्माचार्य पंडित, संस्कृत विद्वेनें पंडित. बापदेवाचे शिष्य भले. त्यांनीं पंथांत फार नांव केलें. भाषाशास्त्र, भक्ति, काव्य आणि अध्यात्म यांत त्यांचा सारखाच प्रवेश; गद्य-पद्य रचनेचा सारखाच अभिनिवेश. 'पंचवार्तिकां'त भाषा, व्याकरण यांचा ऊहापोह केला; 'मार्ग-प्रभाकरां'त भक्ति, ज्ञान, वैराग्य यांचे मार्ग दाखविले. जयदेवाच्या 'गीतगोविंदा'वर 'महाराष्ट्रसुबोधिनी' नामें टीका लिहिली. 'गद्यराजस्तोत्रां'त पंचकृष्णांच्या लीला वर्णून स्तुति केली. अनेक वृत्तात रचना केली. वृत्ताचें नांव त्याच वृत्तांत ओवलें आणि अनुप्रास उत्तम साधले. या आगळेहि त्यांनीं पुष्कळ ग्रंथ लिहिले.

पुढें 'दायंव्यास,' 'भीष्माचार्य लासूरकर' अन् 'ज्ञानदेव' झाले. एकानें 'निर्वेद स्तोत्र' लिहिलें. दुसऱ्यानें गद्यराजावर टीपा लिहिल्या. ज्ञानदेवानें 'पंडुगीता' केली.

90236

गुर्जर-शिव-व्यास हा चक्रधराचा वंशज. यानें 'आवस्थळ', 'विचारस्थळ' आणि 'लक्षणस्थळ' यांची रचना केली. त्यांत चक्रधराच्या सूत्रावर भाष्य केलें. "नुरे तें प्रेमः सोडू न शके ते प्रीतिः साहावासें वीटु नुपजे ते आवडिः पहिले आवडिः मग प्रीतिः मग प्रेमः एक एकाची उत्तरावस्थाः प्रेम हे सेवट."

नृसिंह कवि प्रसिद्ध झाला. त्यानें 'संकेतगीता' केली. गुरु चाल्हणाची कीर्ति केली. 'रुक्मिणीस्वयंवरा' वरहि काव्य केलें. स्वतःचें नांव केलें.

अशी मराठीची सेवा सर्वांनीं केली. आपली कीर्ति केली. जनांस भक्ति दिली. जा, आतां निजा बरें बाळांनो; मी उद्यां तुम्हांला दुसरी कहाणी सांगेन.

* * *

११. १३ व्या १४ व्या शतकांतील महाराष्ट्र

या रे जीवींच्या जिवलगांनो, महाराष्ट्राच्या मुलांनो, मराठीच्या लालांनो, मी आज तुम्हांला ज्ञानेश्वरांनंतरच्या महाराष्ट्राची कहाणी सांगत्यें. ऐका.

यादवांचें राज्य गेलें. शांतीचें आसन डळमळलें. महाराष्ट्राचें अन्तःकरण तळमळलें. वरून आभाळ आलें. सोसाट्याचे वारे सुटले. झाडांचें मूळ उपटलें. प्रासादाचे तोल सुटले. गारांचा सडा पडला, महाराष्ट्राला तडा पडला, कधीं न घडायचा चमत्कार घडला. धैर्याचे बांध फुटले. प्रेमाचे दोर तुटले. शौर्याचे बुरूज ढांसळले. गडचे गड गडबडले. नगरांनीं लोळण फुगडी घेतली. गांवागांवाचें गोत्र तुटलें. भावाचें भावाशीं मन विटलें. वैराचें रोप उठलें. वाऱ्याचा वेग वाढत चालला. दैवाला भर चढत चालला. देश उध्वस्त झाला. जनलोक त्रस्त झाला. महाराष्ट्राला नष्टचर्य आलें. सुखाचें स्वप्न झालें. होत्याचें नव्हतें झालें. रावाचे रंक झाले. फुलावर पहुडणारे चिखलांत लोळूं लागले. एके काळचे जेते आतां हरता डाव खेळूं लागले. शत्रूला खडे चारणारे आतां स्वतःच खडे खाऊं लागले.

याच काळांत महाराष्ट्रांत दुष्काळ पडला. हाच 'दुर्गादेवी'चा दुष्काळ झाला. बारमास सूर्य तप्त राहिला. रात्रंदिवस धरणीमाता तळमळत राहिली. बारा वर्षें पावसाचा थेंब पडला नाहीं. बारा वर्षें

धान्याचा कण उगवला नाहीं. नद्या आटल्या. विहिरी कोरड्या पडल्या. लोकांना प्यायला घोटभर पाणी मिळेनासें झालें. पोटभर अन्न तर दूरच, पण घांसभरहि पाहायला भेटेना. लोकांनीं झाडपाला खाल्ला अन् पोटाची आग विझविण्याचा प्रयत्न केला. त्यांतच रोगराई वाढली. तिनें घरांतील माणसें बाहेर काढलीं आणि स्मशानांत ओढलीं. असा दुर्दैवाचा प्रकोप झाला. कित्येकांनीं देशत्याग केला. आईबापांनीं लेंकरें विकलीं. नवऱ्यांनीं बायका टाकल्या. सहस्रावधि कुटुंबें देशोधडीस लागलीं. असा सर्व देशभर हाहाःकार उडला.

देवाजीनें कृपा केली. मेघराजानें वृष्टि केली. धरणीमातेला तुष्टि दिली. नद्या वाहूं लागल्या. विहिरींना पाणी आलें. वनरानें हिरवीं झालीं. झाडांना पालव्या फुटूं लागल्या. शेतांत पिकें येऊं लागलीं. वेलींवर फुलें हसूं लागलीं. वृक्षांवर पक्षी किलबिलूं लागले. कुरणांत गवत वाढूं लागलें. त्यांत हरणांचे कळप चरूं लागले. कोकिळा पूर्ववत् गाऊं लागल्या. मोर नाचूं लागले. मैना मंजुळ बोलूं लागल्या. वाऱ्याच्या झुळका खेळूं लागल्या. देशांत शांतता येऊं लागली. जनांच्या जिवांत जीव येऊं लागला. ओस पडलेला गांव भरूं लागला. संसाराचा शकट मार्गावर येऊन इकडे राजकीय आकाशहि निवळलें अन् आकाशांत चांद चमकूं लागला. एखाद्या जिवावरल्या दुखण्यांतून उठावें तसें लोकांना वाटलें. त्यांची प्रकृति सुधारली. पण मन दुबळें झालें.

लोकांचें स्वातंत्र्यप्रेम ठायींच निरवलें अन् पारतंत्र्यांतील दुर्गुण मात्र तरारून उठले. ब्राह्मणांनीं अध्ययन-अध्यापनादि षट्कर्में सोडलीं, सेवावृत्ति जोडली. क्षत्रियांचें तेज लोपलें. त्यांनीं शासकांपुढें हात जोडले. भल्यांचीहि क्षात्रवृत्ति मालवली. त्यांनीं सेवावृत्ति पत्करिली. कित्येकांनीं वैश्यवृत्ति स्वीकारली. क्षत्रियत्वाचें वारें गेलें. पैक्याचे ऐकूं लागले. दास्याला सोकूं लागले. वृत्ति पालटली. मन पांगळलें. बुद्धि बारगळली. कर्तृत्व ठेंचाळलें. दृष्टीला मुरळ पडली. ती आपल्या कर्तव्यांत अडली. दुसऱ्याच्या पायावर जडली. स्वार्थापलीकडे दिसेनासें झालें. आपल्यांचा अभिमान गेला. दुसऱ्यांचा अपमान वाटेनासा झाला. धनीपण विसरले. ध्येयापासून घसरले. पाहायचं पाहिलं

नाहीं. करायचं केलं नाहीं. भलतंच केलं. भलतंच झालं. पाहिलं त्यांनीं सांगितलं नाहीं. सांगितलं त्यांनीं केलं नाहीं. केलं त्यांचं बठलं नाहीं. ज्यांनीं नीटपणें पाहिलं त्यांनीं धीटपणें सांगितलं नाहीं. सांगितलं त्याचं कोणीं ऐकलं नाहीं. ऐकलं त्यांनीं केलं नाहीं. पाहणाराला तोंड नव्हतें. बोलणाराला हात नव्हते. हात असणारांचे पाय जड होते.

क्षात्रवृत्तीचें दिवाळें निघालें, ब्रह्मविद्येनें आपलें आसन गुंडाळलें. ब्राह्मण-क्षत्रिय दास झाले. लोक उदास झाले. चारी वर्ण एक झाले. सर्वच सेवक झाले. सर्वांनीं आचार सोडला, अविचार जोडला. घरचा गाडा मोडला अन् दुसऱ्याचा जोडा डोईवर धरला. सर्व समाज परधार्जिणा बनला. आशा-आकांक्षा धरली नाहीं. नेटानें रेटारेटी केली नाहीं. डोकें धड तर पगड्या रगड, असा विचार केला. पगडीपायीं डोकें गमावून बसला. रगडून खावं बिघडून रहावं हें त्याला साधलं नाहीं. स्वतःचं रांधण रांधलं नाहीं. पोटाला देईल तो धनी मानला. उष्टावळीला भाव चढला. स्वतःचा अभिमान गेला. सेवेमध्यें मान वाटला. कोण होतों कोण झालों ? चालणारेहि रांगूं लागले, आधाराला दुसऱ्याकडे बघूं लागले. फुलाच्या पायघड्यांवरून ध्येयाचें मनोराज्य करूं लागले.

धर्माला अवकळा आली. समुदाचार लोपला. अनाचार वाढला. ढोंगधतुरा माजला. लोकांनीं वर्णधर्म सोडला, आश्रमधर्म सोडला. 'स्वधर्मे निधनं श्रेयः' ही गीतेची शिकवण मानली नाहीं. त्यांना परधर्म भयावह वाटला नाहीं. अशी धार्मिक आचाराविचारांत चलबिचल झाली. स्वधर्मावरील श्रद्धा उडाली. धर्माचा अभिमान गेला. वर्णाचा अभिमान गेला. कुळाचा अभिमान गेला. वेदविद्येचा कंटाळा केला. उज्ज्वलतेचा विसर पडला.

धार्मिक आणि सामाजिक आंदोलन झालें. त्याचे भाषेवरहि परिणाम झाले. यादवांचे कर्णाधिप 'हेमाडपंत' यांनीं मोडी लिपि काढली. ती नित्याच्या लेखनाला सुगम केली. अक्षरांची धाटणी किंचित् वेगळी केली. ही लिहिण्यास फार सोपी झाली. व्यवहाराच्या उपयोगी आली. तिचा प्रचार वाढला. असा लिपीनें नवा पायंडा पाडला. मोडीची घडण पाहिली, देवनागरीनेंहि आपली रूढि सोडली. अक्षरवाटिकांना आतां

निराळा आकार मिळूं लागला. तीन शून्यांची 'ई' गेली. आतां डोक्यावर नागफणा धारण करणारी 'ई' आलीं. △ त्रिकोणी 'ए' दडला, कानाकोपऱ्यांत पडला. तीन उभ्या रेघांचा 'ण' अगदीं दिसेनासा झाला. आणि पृष्ठमात्रा अक्षरांच्या डोक्यावर बसल्या. अशी लिपींत क्रांति आधींपासूनच होऊं लागली.

लिपींत पालट झाला, पण भाषेचा ओघ अखंड चालत राहिला. मात्र तिलाहि या काळाचे धक्के बसले. ते तिनें हंसून सोसले. तिला कधीं वळण घ्यावें लागलें. कधीं दगडांतून आपला मार्ग काढावा लागला. कधीं तिजवर शेवाळ चढलें. कधीं डगरी उलथून तिचें पाणी गढूळ झालें. कधीं सूर्यतापान तापून पाणी उणें झालें आणि भोंवतालच्या रखरखीत वाळवंटानें पात्र निरुंद झालें. पण पाणी वाहत राहिलें. महाराष्ट्रीय लोक ते पीत राहिले. तिच्यांतून कांहीं शब्द गेले, कांहीं रूपें लोपलीं, कांहीं वाक्प्रचार मागासले. या सर्वांच्या ठायीं निराळेंच आले. 'राजसत्ते'चें 'सरकार' झालें. 'राजसभे'चा 'दरबार' झाला. 'न्यायधीशा'चें आसन 'काजी'नें बळकावलें; 'अग्रवादी' 'पश्चिमवादी' पळून गेले. 'पत्रा' पालट 'कागद' आला. 'अधिकारी'चा अधिकार गेला. 'वार्षिक देवा' ला 'सालीना मुशाहिरा' मिळाला; असा 'क्रम' जाऊन 'सिलसिला' पडला. 'बाळापूर प्रगणा' जाऊन 'प्रगणें बाळापूर.' ('परगना–इ–बाळापूर.') लिहिण्याची पद्धत निघाली. लोक दिग्विजयी निघाले. पित्याचें नांव बुडविलें. 'कामभट पिता दामभट' जाऊन 'कामभट बिन दामभट' आले. राईक, पाईक मांडलिक मावळले अन् नव्या काळाचे 'जमादार, हवालदार, सरदार' उदयाला आले. 'राव यैसे बोलतीजे...जाऊन राव यैसे बोलती कीं....' अशी पद्धत पडली. त्याच 'प्रती'ची सर्वेषां नक्कल झाली. अशी आरंभा'ची 'सुरवात' झाली.

जी गति यादवा तीच गति माधवा. राजव्यवहाराप्रमाणेंच नित्याच्या व्यवहारांतहि पालट 'वर्षा'चें रूपांतर 'सालां'त झालें; 'दिवसा'चें वेषांतर 'रोजां'त झालें. 'मिती'ची 'तारीख' झाली. अशी 'प्रत्येक वस्तू'ला 'हरजिन्नस' मिळूं लागली. भाषेप्रमाणें वेश-भूषाहि पालटली.

अन् लोक 'नागराचे' 'शहरी' बनले. पुरुषांनीं असे ढंग केले, रंग पालटले. पण स्त्रियांनीं मात्र आपली पूर्वपरंपरा राखली. त्यांनीं आपली भाषा आणि भूषा पहिलीच ठेवली.

या काळच्या विद्वानांनीं अन् साधुसंतांनीं मात्र बहुमोल काम केलें. धार्मिकतेचा पाया भरला. आचारांचे खांब केले. विचाराच्या तुळ्या केल्या. वाङ्मयाच्या भिंती उभारल्या. समाजाचा डुलता कळस सांवरून धरला. धर्माचें रक्षण केलें, संवर्धन केलें अन् समाजांत जीव ओतला.

जा, आतां निजा बरें बाळांनो; मी उद्यां तुम्हांला पुढली कहाणी सांगेन.

◆ ◆ ◆

१२. १४ वें व १५ वें शतक

या रे, रामा-दामांनो, प्रेमा-नामांनो, कान्हा-शामांनो, मी आज तुम्हांला १४ व्या व १५ व्या शतकांतील मराठी कवींची कहाणी सांगत्यें. ऐका.

मागल्या शतकांत काव्याची सरिता दुथडी वाहिली. तिनें परमार्थाची शेती भरपूर पिकविली. मधल्या उन्हाळ्यानें पाणी उणावलें अन् पात्र संकोचलें. पण संतमेघांनीं कृपाजलाचा वर्षाव केला, मराठगंगेचा ओघ अखंड वाहता ठेवला. या काळांत माध्व, जंगम, लिंगाईत, नाथपंथी इत्यादिकांनींहि रचना केली पण ती काळाच्या उन्हाळ्यानें करपून गेली. रामलिंगशिष्य 'सुजात' यानें पदें केलीं; 'कान्ही' त्रिमलानें पाताळखंड ग्रंथ केला. त्यांत रामायणाची कथा पालटून लिहिली. पंथप्रसारक लेखकांनीं रामकृष्णांच्या कथा स्वीकारल्या; पण त्या आपल्या पंथाला पोषक करण्यासाठीं उलटून पालटून रंगविल्या.

या काळीं पुरुषांप्रमाणें स्त्रियांनींहि मराठीची सेवा केली. मंगळवेढ्याची वेश्या, तिचें नांव 'श्यामा.' तिची मुलगी कोमलगात्रा. तिचें नांव 'कान्होपात्रा.' ती आईच्या धंद्याला विटली; पांडुरंगचरणीं विनटली. राजानें तिला आपलेपाशीं राहण्याचा आग्रह केला. तिनें पांडुरंगीं देह अर्पिण्याचा निग्रह केला. राजानें तिला धरणें पाठविलें. पांडुरंगानें तिला स्वरूपीं सांठविलें. कान्होपात्रेनें थोडीशी अभंगरचना केली.

भानुदास म्हणजे नाथांचे पणजे. पांडुरंगाचे भक्त. प्रपंचांत विरक्त. विजयनगरच्या राजानें विठ्ठलास नेलें. तें वर्तमान पैठणास भानुदासास कळलें. 'भक्त भागवत सकळ पारुषले.'

'रखुमाई माई ते जाहलीसि उदास.' 'पुंडलिका मौन पडलें' भानुदास पंढरीस गेले. त्यांनीं विठ्ठलास परत आणण्याची प्रतिज्ञा केली. ते विजयनगरास आले. 'चाल आम्हांसवें' म्हणून देवास विनंति केली. देवाजीनें माव केली. राजानें देवास 'कंठमाला' दिधली. तीच 'देवांनीं भानुदासास दिधली'. त्यायोगें भक्तावर चोरीची आळ आली. 'शूळीं द्यावया भानुदास नेला;' पण त्यानें 'समर्थाचा आधार धरला;' अन् 'कोरडिया काष्ठीं अंकुर फुटले.' असा चमत्कार घडला. राजानें भानुदासाचे पाय धरले, देवास पंढरपुरास धाडलें. भानुदासांनीं अभंगरचना केली. ती सरस झाली. 'मामळभटा'वरील अभंगांत विनोदहि साधला.

कोणी तरी वैदर्भ (बेदर) नगरीं वास करी. त्याचा जन्म मुसलमानी राजघराण्यांत झाला. त्यानें विलासांत काळ घालविला. तो अन्तीं अनुताप पावला. कल्याणीच्या 'सहजानंदास' शरण गेला. त्यांनीं अनुग्रह केला; मुसलमानाचा 'मृत्युंजय' झाला. गुरुकृपेनें त्याचें 'मन चित्त समरसलें, स्वयेंस्वरूप प्रकाशलें, निराकार उघडलें ब्रह्ममय.' त्यानें प्रकाशदीप, स्वरूपसमाधान, अनुभवसार, गुरुलीला, अमृतसार, सीताबोध, पंचीकरण, सिद्धसंकेतादि अनेक ग्रंथ लिहिले. अद्वैताचें अमृत स्वतः चाखलें, इतरांना चाखविलें. वेदान्तासारखे गहन विषय सोप्या भाषेंत सांगितले.

'कर्मभ्रष्ट झाले द्विज' अनाचाराचें रुजलें बीज. यास्तव धर्मसंस्थापनेसाठीं 'दत्तात्रय' अवतरले. त्यांनीं 'नृसिंहसरस्वती' नांव घेतलें. त्यांनीं जनांना सोज्वळ आचार सांगितला, धर्माचा मार्ग दाखविला. अद्भुत चमत्कारांनीं नाठाळांचा भाव धर्मावर बसविला. सर्व महाराष्ट्रभर प्रवास केला. आचारधर्माचा प्रसार केला. दत्तसंप्रदाय वाढविला. नामधारक शिष्य भला. त्याला सिद्धानें गुरुप्रसाद दिला. त्यानें 'लीला'चा संग्रह केला. 'सरस्वतीगंगाधरानें' त्याचा 'गुरुचरित्र' ग्रंथ केला. 'श्रीगुरूंनीं' चमत्कार केला. वांझेला पुत्र झाला. मूर्खाचा धनी

झाला. रजकाचा राजा झाला. मेलेला सजीव झाला. 'अक्षरशत्रु कवि झाला. चांडाळाला पूर्वजन्माचा आठव झाला; अन् तो ब्राह्मणांमाजी आम्ही राजे' म्हणणाऱ्या चतुर्वेदी ब्राह्मणांशीं वादविवाद करूं लागला. 'श्रीगुरूंनीं' योगाचा प्रभाव दाखविला. भक्तीची शक्ति प्रकट केली. रागरागिण्यांची आणि वेदांच्या शाखोपशाखांची माहिती सांगितली. महाराष्ट्रांतील तीर्थांची ओळख पटवून दिली. 'सतीच्या' धर्माची महती गायिली अन् आश्रमधर्माची प्रौढी दाविली. समस्त सृष्टि ईश्वराची,' 'सर्वत्र देव असे' हें तत्त्व प्रतिपादिलें. सर्वांना श्रेय आणि प्रेय दाखवून दिलें. या ग्रंथीं आचारांचा आदर्श आहे, भक्तीची उत्कटता आहे, वेदशास्त्रांचा गहन अभ्यास आहे, श्रद्धेचा कंद आहे, अनेक कथांचा प्रबंध आहे, गुरुभक्तीचा महिमा आहे, मराठी भाषेचा प्रेमा आहे. ग्रंथांत भाषेची शुद्धता, काव्याची रसवत्ता आणि विचारांची पवित्रता आहे. दत्त-सांप्रदायांतील लोक यास पूज्य मानतात. इतरहि भाविक याचें पारायण करतात. या ग्रंथाचें संस्कृतांतहि भाषांतर झालें.

चाळीसगांवचे देशपांडे जनार्दनस्वामी हे गाणगापूरच्या नृसिंहसरस्वतींचे शिष्य होते. दत्ताचे उपासक होते. त्यांनीं थोर तपाचरण केलें. दत्तात्रयांनीं त्यांना दर्शन दिलें. त्यांनीं इकडे प्रपंचहि केला, तिकडे परमार्थहि साधला. इकडे परधर्मीयांची सेवा केली, तिकडे स्वधर्माचरणाची कास धरली. देवगडाचा मुख्याधिकार भोगला; पण कधीं समाधीचा वेळ नाहीं टळला. इकडे राजाचें मन राखिलें, तिकडे देवाचे चरण देखिले. असे जनार्दनस्वामी अलौकिक पुरुष झाले. त्यांनीं एकनाथांना आत्मज्ञान करून दिलें. स्वामींच्या ठायीं कर्तव्य आणि प्रेम असाधारण होतें. त्यांची तपाची गुंफा आणि समाधि देवगडावर आहेत. तेथें प्रतिवर्षी यात्रा भरते. स्वामींनीं जानकीस्वयंवर, दत्तस्तुति, समाधिप्रकरण हे ग्रंथ लिहिले. आरत्या, पदें आणि अभंगहि केले; नृसिंहसरस्वतीवर केलेली त्यांची आरती लोक प्रत्यहीं गाणगापुरीं म्हणतात.

'भैरव' नामें ब्राह्मण तुळजापुरास गेला. तेथें त्यानें निष्ठेनें अनुष्ठान केलें. आई भवानी प्रसन्न झाली. हातीं तीन फळें दिलीं. त्या प्रसादानें

त्यास तीन मुलें झालीं. मधल्या मुलाचें नांव 'त्र्यंबकराज' ठेवलें. त्यावर 'सिद्धेश्वरांनीं' कृपा केली. त्यास ब्रह्मकळा प्राप्त झाली. भवानीनें त्यास ग्रंथरचनेची आज्ञा केली. त्यानें 'बालबोध' अथवा 'बालावबोध' ग्रंथ केला. स्वानुभवाचा सौरभ ग्रंथभर पसरला. अद्वैताच्या मार्गावर त्यानें ग्रंथरूप तोरण बांधलें; अन् वेदान्तविचारांचे घोस ठायीं ठायीं टांगले. त्यानें आपल्या काळची परिस्थिति पाहिली. मतामतांची ओरड झाली. सद्धर्मसरितेंत दरड पडली. भावसरणी काटाळ झाली. ती त्यानें स्पष्ट दाविली. जैन, लिंगाईत, कापालिक, लीलाचरित्राचें गायन करणारे महानुभाव, कानफाटे, योगी, शैव, वैष्णव, नैयायिक, मीमांसक इत्यादिकांच्या मतांचा त्यानें निर्देश केला. मतांप्रमाणेंच देशाच्या मर्यादा सांगितल्या अन् 'वर्णरहित एकेश्वरी पंथा'चाहि उल्लेख केला.

मोठमोठेहि 'जन्मपर्यंत भेदसागरीं डहूळत राहिले.' त्यांनीं पूर्णतेचें परतीर पाहिलें न देखलें. मोठ्यांचा बोजवारा झाला, तेथें अज्ञान्यांचें नांव कशाला? शंकरास 'कृपा उपजली,' त्यांनीं त्र्यंबकराजास 'मोक्षद्वार उघडावया हे किली दिधली.' यास्तव त्यांनीं 'हें मव्हाटें परी बरवें शास्त्रदूहन (दोहन)' केलें आणि 'जेथ होय विध्वंसन सर्व मता' असा बालबोध ग्रंथ रचिला. 'समर्थ वेदांची आज्ञा पाळावी.' 'कर्मीची संज्ञा सांडो नये.' 'जो स्वजाति वालि, अन्य जाती कवलि, तो प्राणी कव्हणें कालीं पवित्र नोहे.' अशी जनलोकांस शिकवण दिली. त्र्यंबकराजानें 'होचि दिवाळी' केली. 'जिव्हेचा पेरेळीं शब्दरत्नें ठेविलीं.' अन् 'संत सज्जनांतें वोवाळी केली.' सज्जनांनीं 'प्रसन्नता' दाविली. 'वाग्देवता उल्हास पावली.' 'ब्रह्मविद्येची पूर्णता पदांनीं' प्रसवली. त्र्यंबकराजानें 'वाचा वेचिले शब्दहिरे' अन् मराठीचीं उघडलीं भांडारें. त्यांनीं 'सहजाचि वोवी वोविली,' ती 'महामणीची प्रभावळी जाहली.' ग्रंथांत 'चातुर्यता वरी उपदेश' आहे. 'निर्धारू आणि ज्ञानप्रकाश' आहे. 'सद्विद्या आणि सुरसु' आहे. यांत योगविद्येचें शिखर गांठलें आणि मराठीचें मखर थाटलें.

'गोविंदराज' महानुभावानें 'भक्तिप्रबोध' रचिला. त्यांत भक्तीचा महिमा गायिला. 'तेणें स्मरणें आकर्षिलीं' अन् 'श्रीमूर्ति पुढें उभी

जाली.' ती अनुतापाच्या आसनीं बसविली; ' नेत्रजळ हेलावलें.' ' तेणें उष्णोदकें चरण क्षाळण केले.' ' मोगर्या चांफेकळियाहुनि परिमळी मन सुमनें ओळगविली श्रीदेवरायासी.' 'भावाचा कणक–(कनक)–परिमेळ केला.' अन् जीवाचा रत्नदीपु उजळिला.' ग्रंथ लहान झाला; पण रसिकांना मान्य झाला.

कृष्णमुनीनें ' ब्रह्माण्डगोलक ' ग्रंथ रचिला. अर्जुनानें अठरा अध्याय गीता ऐकिली; तरीहि शंका पुढती उरली. यांत श्रीकृष्णांनीं तिचा परिहार केला. वाईदेशकर भीष्माचार्यांनें अनेक ग्रंथ केले. पंथाचें नांव वाढविलें.

संतोषमुनि कृष्णदास हा पारमांडल्य आम्नायांत झाला. यानें ' रुक्मिणीस्वयंवर ' ग्रंथ केला. तो पंथांत फार प्रिय झाला. ' शब्द-ब्रह्मींच्या मुद्रिका ' वर ' वेदपुराणांचीं रत्नें ' अनेक. त्यांमध्यें ' माणिकलें श्रीभागवत ' एक. जैसे ' माणिकामाजी कीळपडिखर, ' तैसें ' भागवतीं रुक्मिणीस्वयंवर.' असें प्रसंगाचें महत्त्व वर्णिलें. त्यानें आपल्या रसाळ वाणीनें सारस्वताचे चषक रसिकांस अर्पिले. त्याचप्रमाणें त्यानें मराठीचेंहि मनोहरत्व दाखविलें. संस्कृत-प्राकृतादि वाणीचे षट्प्रकार, मात्र यांचा ' प्राकविस्तार करावेया मव्हाटी एक चतुर.' ' संस्कृतावरी महाराष्ट्री टीका ' म्हणजे ' हेमाची मुद्रिका (वरी) गरुडपाचू.' ' हे (मराठी) छप्पन भाषांची मुकुटीं शोभे सुहावी सुंदर गोमटी.' असा मराठीचा कैपक्ष घेतला; ग्रंथांत यथार्थ करून दाखविला.

या काळांत मराठीनें आपलें आसन महाराष्ट्रांत बळकट केलें, वर देशपर्यटनहि केलें. ज्ञानदेव-नामदेवांनीं पूर्वी वाट दाखविली. ती हिनें ध्यानांत राखिली. पंचनद (पंजाब) प्रांतांत महानुभाव पंथाचा प्रवेश झाला. त्यांच्या तेथील मठामठांतून हिनें निवास केला. असा हिचा लौकिक दूरवर गेला.

जा, आतां निजा बरें बाळांनो; मी उद्यां पुढली कहाणी सांगेन.

* * *

१३. श्रीएकनाथ

या रे, भोळ्या-भाविकांनो, प्रेमळ रसिकांनो, मराठीच्या पाइकांनो, मी आज तुम्हांला एकनाथांची कहाणी सांगत्यें. ऐका.

गोदेचें तीर पावन थोर, तीरावर वसलें पैठण नगर. पैठण हें साधूंचें माहेरघर होतें अन् वेदविद्येचें आगर होतें. तेथें भगवद्भक्त भानुदासाच्या कुळांत नाथांनीं जन्म घेतला. त्यांनीं देशाचा उद्धार केला, धर्माचा प्रसार केला, मराठीचा पांग फेडला अन् सर्व जन्म सार्थकीं लावला. पैठण दक्षिणेंतील काशी, नाथासाठीं आले द्वारकानिवासी, अशी पैठणच्या कीर्तीला नाथांनीं आपल्या पुण्याईची जोड दिली.

बाळपणापासूनच त्यांना 'महासुखाची आवडी गाढी' लागली. त्यांनीं लौकरच जनार्दनचरणीं मिठी मारिली. त्यांनीं सर्व दोष 'निजात्म-बोधानें प्रक्षाळिले,' अन्तःकरण पवित्र केलें, 'उगाळोनि अहंपण सोऽहं काढिलें शुद्ध चंदन;' अन् त्यानें अर्चिला चर्चिला जनार्दन. 'गुरूचें नाममात्र तेंच (त्याचें) 'वेद शास्त्र' नित्य करितां गुरुसेवा प्रेमपडिभर होत जीवा.' नाथांनीं 'गुरुकृपेचें वर्म' जाणिलें, 'जग परब्रह्म' देखिलें. त्यांनीं 'निज मुक्ति' उपेक्षिली,' त्यांना 'गुरुभक्ति पढिये' वाटली. गुरु माउली प्रसन्न जाहली. तिनें आत्मज्ञानाची ठेव दाविली; 'सकल वैभवेंसी शांति सुख' दिलें आणि श्रीदत्तात्रेयांचें दर्शन करविलें. येथून त्याचें 'अन्तर जडलें आत्मस्थिति' अन् 'बाह्य रंगलें भगवद्भक्ति.

नाथांनीं गुरुसांगातीं तीर्थाटन केलें आणि देश, धर्म, भाषा यांच्या स्थितीचें अवलोकन केलें. त्यांनीं परिस्थितीचें आकलन केलें आणि उपायांचें चिंतन केलें. पुढें गुर्वाज्ञेनें नाथांनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला. गिरिजाबाईंचा नाथाघरीं प्रवेश झाला. सुगृहिणी म्हणजे संसारांतील पर्वणी. घरांत नांदे पतिव्रता, अंगणांत वाढे मोक्षलता. शीलवती घरीं नारी, सर्व सुखें उभीं दारीं. पतिव्रतेचा श्वासोच्छास, पावन जैसा जगन्निवास. पतिव्रता बोले चाले, धरणी माता हर्षुनि फुले. पतिव्रता हंसून पाही, गुलाल उधळिती दिशा दाही. गिरिजाबाई माउली, नाथांशीं एकरूप जाहली. तिला 'केवळ सेवेची आवडी' उरली. नाथांची गिरिजाबाई पत्नी, 'जैसी योगिया लागली उन्मनी.' नाथांची गिरिजा गोमटी, 'चित्त चैतन्याची पडली मिठी.' 'धन्य धन्य वो माये वंदावे पाय इयेचे.' 'स्त्रियांची गोडी अनुकूलता' ती नाथांच्या प्रपंचांत नांदत होती. 'देवावीण दुजें देखावया संसारीं उरी नाहीं उरली.' त्यांच्या प्रपंचाच्या आलवाली. परमार्थलता पालवली. ते 'संसारी सदा सर्व-भूंतहितकारी' होते, म्हणून भगवंत त्यांच्या घरीं पाणी भरीत होते. असा गिरिजाबाईसह नाथांनीं संसार थाटानें केला; जनलोक परमार्थाच्या थाटानें तरून नेला.

'जैसा बोले तैसा क्रियार्थ', हें त्यांच्या आचरणाचें सार होतें. सर्व जन्मभर ते गृहस्थाश्रमाची थोरवी आचरून दाखवीत होते. प्रत्येक आश्रम आपापल्यापरी थोर आहे; पण गृहस्थाश्रमाचें पुण्य अपार आहे. त्यांनीं अतिथींचा सत्कार केला, ब्रह्मचिंतनावांचून त्यांचा क्षण नाहीं वायां गेला. त्यांनीं कर्मठपणा मोडला, भक्ति-मार्ग जोडला. 'नुसत्या हरिनामाचा घोष' लावला अन् सारा 'जनलोक भुलविला.' नाथांनीं सकाम व्रताचार अनादरिला; सदाचार स्वीकारिला. त्यांनीं सर्वांभूतीं भगवद्भाव पाहिला; गोखर, चंडाळ, श्वान यांत भेद नाहीं मानला. 'जेणें आपणासि दुःख होतें' तें तर दुसऱ्यास कधींच दिलें नाहीं; पण 'आपलें सुख' मात्र सर्वांस वाटलें. त्यांनीं अनाथांना सनाथ केलें; दीन अपंग उद्धरिले. जी प्रीति 'हरिवरती' तीच इतरांच्याहि

लेंकरांवरती केली. वाळवंटांतील महाराच्या पोरास उचलून कडेवर घेतलें आणि श्राद्धाचें अन्नहि महारांस वाटलें. असा 'भूतीं भगवंत पाहतां तेथें 'कैची उरे द्रोहाची वार्ता!' नाथ 'दया दाविती पावलों-पावलीं,' जैसी वृक्षा संगें सावली. त्यांनीं साधूंचीं लक्षणें भागवतीं सांगितलीं, तशीच त्यांची वागणूक जनांनीं वधितली. नाथ 'स्वानंदीं तृप्त झाले,' 'जगाच्या जीवनीं निवाले,' काशीची कावड रामेश्वरास नेली; पण पाण्यावांचून तळमळणारें गाढवहि परमेश्वररूपच पाहून ती त्यास पाजली, असे 'जीवें प्राणें भक्तीसी विकले, कर्मांची आठवण विसरले.' कर्मठांनीं त्यांना प्रायश्चित्त दिलें. तें नाथांनीं समाधानानें घेतलें. छळकांनीं त्यांचा छळ फार केला. नाथांनीं त्यांचा मळ (पाप) दूर केला. निंदकांनीं त्यांची निंदा केली. नाथांनीं त्यांचीं पावलें वंदिलीं. जे कोणी निंदिती तेहि आम्हां ब्रह्ममूर्ति' अशी त्यांची वागणूक होती. निंदकाविषयीं त्यांनीं म्हटलें, 'निंदक कामाचा कामाचा गडी आत्मारामाचा.' 'एक अद्वैत ब्रह्म पाहीं दुसरें आणिक कांहीं नाहीं' 'ब्रह्मावेगळा पाही प्रपंचू नाहीं' असें त्यांचें सांगणें होतें. 'राहे अलिप्त संसारीं, अंतरीं धरूनिया हरि,' असें सांगण्यासारखेंच त्यांचें वागणें होतें. 'लीनता भरली सबाह्यांतरीं, ब्रह्मादि-मशकेरवी, (ते) सर्वांतें वंदिती शिरीं.' जशी लीनता तशीच समाधानता आणि शांतता. ते सुरस कथा सांगती, अथवा लौकिक बोल बोलती, परी त्यांची समाधि मुद्रा न खंडती; आणि मौन न मोडे कवणें रीति.' 'पूजितां कीं गांजितां त्यांची उंडळेना समता.' त्यांनीं भागवतधर्मांचें खरें 'रहस्य' जाणलें. तें त्यांच्या रोमरोमांतून भिनलें. 'अभेदभक्ति वैराग्यज्ञान स्वयें आचरिलें आपण.' त्यांनीं जनलोकांसाहि दिधली तीच अमोल शिकवण.

एकनाथ म्हणजे महाराष्ट्राचे 'एक' नाथ होते. ते भागवतधर्म-मंदिराचे स्तंभ होते. ते कृपेचे सागर, प्रेमाचे आगर आणि विचाराचे रत्नाकर होते. नाथ म्हणजे वैराग्याचें वैरागर, भक्तीचें माहेरघर आणि ज्ञानाचे भास्कर होते. ते भूतदयेचें मेघमंडळ,–सदाचारांचें पुण्यस्थळ आणि सद्वृत्तीचे विश्रामस्थळ होते. ते गृहस्थाश्रमधर्मांचें संगोपनस्थळ, मुक्तीचें पाठबळ आणि मराठी भाषेचा परिमळ होते. त्यांना आसक्ति

शिवली नाहीं. कोपाची सांवली तर त्यांच्या पावलापाशींहि डळमळली नाहीं. त्यांनीं विषयांचा वाडा पाहिला नाहीं. ते 'स्त्रीसंगें प्रजा व्यालें परि ब्रह्मचर्या नाहीं मुकले.' 'पद्मपत्रमिवाम्भसि' असा त्यांनीं संसार केला, महाराष्ट्र समाज सन्मार्गाला लाविला. नाथांनीं आपल्या चारित्र्याच्या रूपामें अलौकिक तसेंच चिरंतन काव्य निर्माण केलें आणि पदापदांतून अद्वितीय असा अक्षर ब्रह्मरस वाहूं लागला. तो स्त्री, शूद्र, ब्राह्मण या सर्वांनीं सारखाच चाखला.

नाथांनीं असा संसार केला अन् फाल्गुन वद्य षष्ठीला देह ठेवला. नाथांच्या चरित्रांत या तिथीची महती मोठी, या तिथीला घडल्या अनेक गोष्टी. नाथांचे गुरु जनार्दनस्वामी त्यांचा जन्म षष्ठीलाच झाला. षष्ठीलाच दत्तांनीं त्यांना 'दर्शनाचा लाहो' दिधला. याच तिथीला स्वामींनीं नाथांवर अनुग्रह केला. षष्ठीलाच स्वामींनीं समाधि घेतली अन् नाथांनींहि तीच पावन तिथि साधली. षष्ठीचा उत्सव नाथांनीं गुरुप्रीत्यर्थ आरंभिला. पुढें एका जनार्दनीं विलीन झाला तेव्हांपासून गुरूचा उत्सव नाथांच्या नांवानें प्रसिद्ध झाला.

भगवंतांनीं अर्जुनास गीतेमध्यें सांगितलें, 'धर्मसंस्थापनेसाठीं मीं युगीं युगीं अवतार घेतले, त्याचें अलीकडील प्रत्यंतर नाथांच्या चरित्रांत पाहावयास मिळालें. धर्माचार लोपला. विहिताचार हरपला. तेव्हां आचार्यांचा अवतार झाला. यांनीं बौद्ध-जैनादि पाखंडांचें खंडन केलें, संन्यासाचें मंडन केलें अन् अद्वैताचा प्रसार केला. आपला कीर्तिडिंडिम आसेतु-हिमाचल गाजविला. पुढें कांहीं काळानें धर्माला पुन्हा अवकळा आली. आचाराची कळी करपली. विचाराची लता खुरटली. ज्ञानाची सरिता संस्कृताच्या अरण्यांतच घोटाळली. जन-लोकांना रानभूल झाली. तेव्हां श्रीज्ञानेश्वरांनीं भागवतधर्माची ध्वजा उंच उचलिली. ती महाराष्ट्रभर मिरविली आणि लोकांची गाडी भागवतधर्माच्या चाकोरीवर आणिली. त्यांनीं जनांना भक्तीची गोडी लावून दिली. त्यांनीं त्यांना मुक्तीची पेठ दावून दिली. ज्ञानदेव-नाम-देवांचा अवतार आटोपला अन् मधल्या काळांत भागवतधर्माचा आठव बुजत चालला. ज्ञानाचा विसर पडूं नये, नामाचा गजर अडूं नये,

भागवतधर्माला खंड पडूं नये, यास्तव नाथांचा अवतार झाला. त्यांनीं समाज जागा केला.

कर्मठपणा वाढला. ढोंगा-सोंगाला रंग चढला. मंत्रातंत्राचें साम्राज्य माजलें. सगळीकडे अंधळें गारूड झालें. ज्ञानाची खोल दरी, कर्माचा कचाटा भारी, योगाची तर गोष्ट दुरी, अशी चहूंकडून जनांची अडवणूक झाली. मनाची कुचंबणा झाली. वृत्ति बावरली, मन तरळलें. कार्याकार्य कळेना. असे लोक दीन झाले. त्यांना नाथांनीं सन्मार्गावर आणलें. लोकांच्या मनांत त्यांनीं भागवतधर्माचें बीज रुजविलें. त्याला स्वाचरणाचें पाणी घातलें. त्यायोगें श्रद्धेचीं मुळें खोल गेलीं. वर सद्वासनांच्या पालव्या फुटल्या. त्याला भक्तीचीं फळें-फुलें येऊं लागलीं. या फळां-फुलांवरली कीड घालविण्यासाठीं नाथांनीं कीर्तनें केलीं आणि त्यांना टवटवी दिली. कर्मठांच्या बांडामुळें जो कोंडमारा झाला त्याला आतां भक्तीचा वारा लागला. लोकांच्या उत्साहाला फुलवरा आला. त्यांच्या कर्तृत्वाचा परिमळ सर्वत्र दरवळूं लागला. भागवतधर्माचा उपदेश करून नाथांनीं भोळ्याभाळ्यांची अशी सोडवणूक केली. त्यांनीं 'द्वैताची अर्गळा काढली,' शास्त्रांची 'शृंखळा फोडली' अन् 'अद्वैत-सुमन शाळा उघडली.' या प्रकारें नाथांनीं ज्ञानेश्वरांची परंपरा पुढें चालविली, पालविली आणि फुलविली.

जा, आतां निजा बरें बाळांनो; मी उद्यां पुढली कहाणी सांगेन.

★ ★ ★

१४. श्रीएकनाथ

या रे भोळ्या भाविकांनो, प्रेमळ रसिकांनो, मराठीच्या पाइकांनो, मी आज तुम्हांला एकनाथांची कहाणी पुढें सांगत्यें ऐका.

नाथांनीं मराठीची सेवा केली, विपुल ग्रंथसंपत्ति निर्मिली. जनार्दनांनीं आज्ञा केली. नाथांनीं 'चतुःश्लोकी भागवता'वर मराठी टीका केली. 'श्रीभागवत आणि भाषा मऱ्हाठे, हें बोलणें नवल वाटें, पूर्वीं नाहीं ऐकलें कोठें,' परी तेथें 'शब्दापुढें ज्ञान धांवे, ओवीपुढें अर्थ पावे,' अशी नाथांची रचना झाली. आदिनारायणांनीं ब्रह्मदेवास चार श्लोकांत गुह्यज्ञान सांगितलें. त्यावर नाथांनीं हें सुरस भाष्य केलें. नाथांनीं 'गीतासार,' आनंदानुभव, 'हस्तामलक', 'शुकाष्टक', 'स्वात्मसुख,' 'आनंदलहरी' इ. लहान ग्रंथ रचिले अन् ब्रह्मज्ञानाचें विवरण केलें.

अनेकांनीं 'रुक्मिणी-स्वयंवरा'वर रचना केली; पण नाथांची गोष्ट सगळ्यांहून आगळी. त्यांनीं कृष्ण-रुक्मिणीच्या विवाहासहच त्यांत जिवाशिवाचें लग्न लाविलें; प्रपंचासंगें परमार्थाचें विवरण केलें. 'सत्वानिला अतिधार्मिक राजा भीमक' हा मूर्तिमंत विवेक. त्याची 'शुद्धमति श्रद्धा पत्नी, तेथें जन्मली चिच्छक्ति रुक्मिणी.' तिनें श्रीकृष्णाची कीर्ति ऐकिली. तिच्या 'हृदयीं मूर्ती आविर्भवली' अंग रोमांचित जाहलें. नेत्रीं बाष्प दाटलें. शरीर चळाचळा कांपूं लागलें. असें तिला कृष्णकीर्तीनें 'झडपिलें.' 'भक्तिपाशीं भावना गेली, तशी माय धांवोनि आली.'

रायानें विचार केला. श्रीकृष्ण वर नेमिला. पण विकल्प रुक्मिया कृष्णद्वेषी, वचन न मानेची त्यासी. त्यानें शिशुपाळ सोयरा 'नियोजितां' 'दचकली राजदुहिता'. 'तिनें निजभावाचा ब्राह्मण पाठविला श्रीकृष्णालागून.' जेथें वीज पिळून घातले सडे, मुक्तिपताका चहुंकडे, जेथें शुक पिंगळे अनुवादत तेणें वेदान्त दचकत, 'जेथें पक्षी बोलती गुह्यार्थ,' अशा द्वारकेस तो आला. त्यानें कृष्णास रुक्मिणीचा भाव कळविला. कृष्णानें रथ कुंडिनपुराकडे वळविला. 'लग्नाआड एक राती' म्हणून रुक्मिणी उपरीवरती (माडीवरती) वाट पाहात होती. नेत्रीं अश्रुधारा वाहती. दुःखें थरथरा कांपत होती. धरितां धीर न धरवे तिजप्रती. तों डावा डोळा लवला. बाहु स्फुरती वेळोवेळां. असा शुभशकुन झाला. सुदेव ब्राह्मण परत आला. त्यानें कृष्णागमनाचा भाव सुचविला. तेव्हां 'अंगीची उतटली कांचोळी, मुद्रिका दाटली, सर्वांगें हरिखली वेल्हाळी.'

भीमकाकुळीं चाल पुरातन विवाहाआधीं करावें अंबिकापूजन, तेथें 'भीमका पाहे कृष्णवंदन, नयनीं गुंतले नयन, दोहींचा एक झाला प्राण, पाणिग्रहण, जीव-शिवां' स्थीं घालोनी रुक्मिणी धेवोनी गेला शारंगपाणी. शिशुपालादि वीर धांवले; पण यादवांहातीं पराभव पावले. रुक्मिया युद्धास आला. कृष्णानें 'वोढोनि आणिला रथातळीं.' कृष्णानें 'झळपति गदा काढिली. भीमकी घाबरली. तिनें चरणांवरी माथा ठेविला, दीनबंधु विनविला अन् स्वबंधु वांचविला. पुढें भीमकानें श्रीकृष्ण नगरास आणिला; विवाहाचा अपूर्व सोहळा केला. हळद लावण्यापासून धवळे गाण्यापर्यंत अन् गणपतिपूजनापासून धेंडा वांचाविण्यापर्यंत सर्व सोहळे केले.' ते नाथांनीं सरस वार्णिले.

ग्रंथांत वाणीचा विकास आहे; भावनेचा विकास आहे. प्रतिभेचा प्रकाश आहे. यांत वर्णनाचे प्राकार आहेत, उपमा-उत्प्रेक्षा-रूपक-दृष्टान्तादि अलंकार आहेत. यांत शृंगाराची कांति आहे, वीराची दीप्ति आहे, हास्यविनोदाची सूक्ति आहे अन् शांतीची प्रतीति आहे. भाषेंत गोडी अन् वर्णनांत प्रौढी आहे. मधून मधून अध्यात्माची गुंफण आहे. सर्वत्र अनुभवाची शीतल शिंपण आहे.

दत्तात्रेयानें प्रेरणा केली. सद्‌गुरूनें आज्ञा केली. संतांनीं 'थोर साक्षेप' केला. नाथांनीं 'भागवत' (सं. भागवताच्या एकादश स्कंधावर टीका) ग्रंथ रचिला. अन् 'सोलीव विवेकाचा विवेकू सांगितला.' श्रीकृष्णांनीं उद्धवास जें ज्ञान सांगितलें, तें नाथांनीं सर्व जनलोकांस वांटून दिलें. ग्रंथाचे पहिले पांच अध्याय पैठणांत केले, अन् इतर भाग 'वाराणसी आनंदवनीं' रचिला. 'हे टीका तरी मऱ्हाठी, परिज्ञानानें होईल (झाली) लाठी.' या ग्रंथानें मुमुक्षूंना परमार्थ दिला, साधकांना साधन दिलें, भोळ्या भाविकांना भक्तीचें वाढण दिलें, यांत भागवतधर्म वर्णिला, भगवद्भक्त दाखवून दिला, मायेची नांदणूक सांगितली, अन् तिचा तरणोपाय दर्शविला. यांत परब्रह्माचें निरूपण केलें आणि 'अभक्तां अधमां गति कैसी?' या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर दिलें. ज्ञानेश्वरीनंतर वारकरी पंथांतील लोक यालाच प्रमाणग्रंथ मानतात.

या ग्रंथाच्या योगें नाथांनीं जनलोकांला पुढीलप्रमाणें शिकवण दिली. इंद्रियें कोंडितां कोंडत नाहींत, विषय सांडितां सांडत नाहींत. यास्तव हरिभक्ति करा म्हणजे 'विषयासक्ति सहज राहे (थांबते). सर्व कांहीं भगवंतास अर्पण' करा. त्यांत 'मुख्यत्वें भजन' करा. हाच भागवतधर्म. येथें नको 'नाना व्युत्पत्ति सुगमोपायें ब्रह्मप्राप्ती' भागवत-धर्माची अशी स्थिति कीं, 'भोळींभाळीं भवाब्धि तरती', स्त्रीशूद्रादि आवघ्या जाती, त्यांना नाथ ही भागवतधर्माची नौका देती. ते भजन-भावें स्वतःच अन् एकाच खेपेस परतीरास जातो. सगळ्या उपायांमध्यें 'अति प्रांजळ निर्विघ्न आणि नित्य निर्मळ' असा हा 'भक्तियोग केवळ' अन् 'भक्ति म्हणजे सर्वांभूतीं सप्रेम भजनयुक्ति.' आवडी हरिकथा ऐकतां, नाना चरित्रें श्रवण करितां, आत्मचर्चा हृदयीं धरतां भक्ति उपजते. 'भक्तिवीण विद्याशास्त्र केवळ भारवाहक.' 'हेतुक अथवा अहेतुक' कसेंहि कर्म करा; पण भगवंतीं अर्पण करा. भक्ताला माया बाधत नाहीं, योग अडवीत नाहीं अन् कर्म बुडवीत नाहीं. भक्ताची समाधि कधीं भंगत नाहीं. देही असून भक्त विदेही असतो. हीच त्याची अखंड समाधि. 'गा खर चांडाळ श्वान, अति निंद्य जे हीन दीन, ते भगवद्रूप देखोनि पूर्ण घाली लोटांगण, अनन्यभावें,' तोच भगवद्भक्त.

सर्व भागवताचें सार ' ब्रह्मप्राप्तीचें सुगम साधन तें सप्रेम भगवद्भजन ' आहे. ' जातीनें नीचत्वा गेला ' तो ' भक्तिभावें उंचावला.' यास्तव परमेश्वरापायीं भाव धरा. ' भाव तोचि देव ये अर्थीं संदेह धरूं नका.' ' पाउला पाउलीं चिंतावी माउली, विठाई साउली आदि अंतीं.' त्यानें चारी मुक्ति घरीं चालत येती.

नाथांच्या भागवतांत त्यांच्या बुद्धीची व्यापकता, हृदयाची विशालता, आचाराची शुद्धता, विचारांची गंभीरता, विरक्ताची विरक्तता, भक्ताची प्रेमळता, ब्रह्मींची पूर्णता आणि काव्यांतील रसवंती आहे. त्यांत लोकोद्धाराची तळमळ आहे अन् अन्तःकरणांतील खळबळ आहे. त्यांत भाषेचा प्रसाद आहे, कल्पनांचा विलास आहे, भावनेचा सुवास आहे अन् आत्मीयतेचा प्रकाश आहे. ग्रंथानें अद्वैताचा प्रसार केला तर भक्तीचा शृंगार घासून साजरा गोजिरा केला. त्यानें संस्कृतीचा सुवर्ण-कोष लुटविला अन् सुविचारांचा प्रसाद घरोघर वांटविला.

नाथांनीं भावार्थरामायण लिहिलें, त्याची पंचवीस सहस्र ओवी झाली. ग्रंथ अपूर्ण राहिला. श्रोतृवृंद हळहळला. त्यानें नाथचरणीं आग्रह धरला, ग्रंथ पाहिजे पूर्ण केला. नाथांनीं ' गावबा 'स आज्ञा केली. ती गावबानें शिरीं धरली. ' गावबा ' म्हणजे गांवढळ पोर; पण नाथ-कृपेनें झाला थोर. गुरुकृपेनें नवल झालें. गावबानें रामायण संपविलें. तो नाथांशीं एकरूप झाला. त्याचा ग्रंथहि नाथांसारखाच उतरला. नाथांनीं पहिलीं पांच कांडें रचिलीं. गावबांनीं पुढलीं दोन रचिलीं, एकंदर ओवी चाळीस सहस्र झाली. ग्रंथांत प्रसन्नता आहे, अध्यात्म आहे, मनुष्यस्वभावाची विविधता आहे, बुद्धीचा समतोलपणा आहे, विवेचनाची सूक्ष्मता आहे, कथेचा रसाळपणा आहे, भाषेचा सरळपणा आहे अन् भक्तीचा प्रेमळपणा आहे.

नाथांनीं स्वतंत्र रचना केली तशीच ज्ञानेश्वरीसारख्या पूर्वग्रंथांचीहि सेवा केली. ज्ञानेश्वरी म्हणजे शरत्पौर्णिमेचें चांदणें. पण आकाश ढगाळलें. चांदणें उणावलें. नाथांनीं आपल्या उत्साहाच्या वाऱ्यानें ढग दूर केले त्या ' अति शुद्ध ' ग्रंथांतून त्यांनीं ' अबद्ध पाठांतर ' काढून

टाकलें अन् पुन्हां चांदणें पाडलें. 'नाथां'नीं ज्ञानेश्वरीवर प्रवचनें केलीं; जनलोकांना तिची गोडी लावून दिली.

नाथांनीं दशावतार, कृष्णज्ञान, दत्तजन्म, ध्रुव, प्रल्हाद, उपमन्यु, सुदामा इत्यादि पौराणिक संतांचीं चरित्रेंहि गायिलीं आणि एकादशीव्रत, तुलसी इत्यादिकांचीं माहात्म्येंहि वर्णिलीं. नाथांनीं या कथा, आख्यानें अन् माहात्म्यें यांच्या योगानें जनांना पुराणांचा परिचय करून दिला, आचारांचा मार्ग दाखविला, अन् सुविचारांचा पाठ शिकविला. ह्यांतील पुष्कळशीं आख्यानें अभंगरूपानें रचिलीं. नाथांनीं आळीप्रमाणें पदें आणि अभंग यांची विपुल रचना केली. कृष्णलीला, कृष्णजन्म, कृष्णाचें बाळपण, नाममाहात्म्य, देवभक्ति, उपासना, हळदुळी यांवर त्यांनीं शेंकडों अभंग, पदें रचिलीं अन् लहानथोर स्त्री, शूद्र यांस मोक्षाचें द्वार सारखेंच उघडें केलें. त्यांची उपदेशाची रीत इतरांहून वेगळी. विद्वानांसाठीं वेगळी अन् अज्ञान्यांसाठीं वेगळी. खेळतां खेळतां त्यांनीं ज्ञान दिलें; अज्ञांना सुज्ञ केलें. खेळांवर त्यांनीं अभंग रचिले अन् खेळत खेळत अध्यात्माचे घुटके पाजले. कांडण, पिंगा, फुगडी, भोंवरा, लपंडाव, बावडी, झोंबी, एकी-बेकी इ. सर्वांतून त्यांनीं अध्यात्म सांगितला अन् नामाचा महिमा गाऊन मोक्षाचा ठेवा दाखवून दिला. 'हरि बोला देतां, हरि बोला घेतां' असा हरिनामाचा प्रसाद त्यांनीं वांटून दिला. जनलोकांना संसारांतून मार्ग काढून दिला अन् वेदान्त आणि व्यवहार यांचा सांधा सांधून दिला.

नाथांचे अभंग अतीव मधुर झाले. त्यांत त्यांनीं अध्यात्माचे रंग भरले अन् मधून मधून हास्यविनोदाचे तुषार सोडले. त्यांत शब्दांची वेचकता आहे अन् फुलांची मोहकता आहे. त्यांत भावना जिव्हाळ्याची आहे. भाषा उफाड्याची आहे. विषयाला साजावें अन् लोकांना समजावें, हेंच तिचें रूप. तिला संस्कृताची आवड नाहीं. परकी शब्दांचें बावडें नाहीं. रत्न आणि गारगोटी सर्वांचा संग्रह तिच्या (पोटीं.) पण उपयोगांत मात्र कलात्मक दृष्टि. नाथांची अभंग-

वाणी म्हणजे गंगेचें पाणी. नाथांची अभंगवाणी एकुलती एक अन् लाडकी लेक.

नाथांनीं पद्य-रचना केली, तशीच गद्य-रचनाहि केली. 'जिवाजीपंत ठाणेदार वास्तव्य कायापुरी' यांचा आणि 'आत्मारामपंत' यांचा पत्र-व्यवहार त्यांनीं व्यक्त केला; तर कायापुरीकर जिवाजीपंत सुभेदार यांचा अर्जदास्त त्यांनीं लिहिला आणि 'प्रगणे मजकूरचे जमेदार दंभाजी शेटये व कामाजी महाजन व मनीराम देशमुख व ममताई देशपांडी व क्रोधाजी नाईकवाडी ऐसे हरामजादे फार आहेत, तें सरकार कामाचा कयास चालूं देत नाहींत असा 'बंदगी रोशन' केला.

'भा' म्हणजे दीप्ति, 'रूढ' म्हणजे वर अधिष्ठित असलेलें. 'भारूड' म्हणजे दीप्तीवर अधिष्ठित असें तेजस्वी गीत. 'भार' म्हणजे जन-समूहासंबंधीं रचलेलें; अथवा जनांनीं आदरलेलें गीत. 'भारूड म्हणजे बहुरूढ, फार रुळलेलें अर्थात् जनांनीं फार आदरलेलें लोकप्रिय गीत. मराठीच्या बाळपणींच 'भारुडा' चा जन्म झाला. ज्ञानदेव-नामदेवांनीं त्याचें लालन केलें, पण नाथांनींच त्याचें पालन, पोषण आणि संवर्धन केलें.

भारुडाच्या योगें नाथांनीं अमोल जनसेवा केली. त्यांनीं 'भुत्या' बनून दिवटा नाचविला, 'बया दार उघडा' असा विश्वमोहिनीला आवाज दिला, कधीं 'गोंधळी' होऊन 'गोंधळ' घातला; चार वेदांचा फुलवरा अंबेवर बांधला अन् भवानीआईला 'रोडगा' वाहिला; कधीं 'जागल्या' होऊन 'उठा कीं जी मायबाप! कशी लागली झोंप?' म्हणून त्यांनीं राखणीची ललकारी दिली अन् कधीं 'महार' होऊन 'जोहार' घातला अन् 'अखंड कैलासींचा दारवटा मोकळा केला कीं जी मायबाप' अशी आरोळी दिली. कधीं सासुरवाशीण बनून 'विषया'चें सासर नको म्हटलें; तर कधीं यांनीं जोशी होऊन शकुन सांगितले आणि 'रामनाम घ्या' असें 'दान' सांगितलें.

नाथांच्या भारुडांत विषयांचा व्यापकपणा आहे, संख्येचा अधिक-पणा आहे, त्यांत रचनेचें सौंदर्य आहे. भाषेचा ठसठशीतपणा आहे.

त्यांची भाषा विषय आणि पात्र यांस अनुसरून आहे. तींत नाद-माधुरी आहे, रचनाचातुरी आहे. त्यांत विचारांचा सखोलपणा आहे; मनुष्यस्वभावाचा विविधपणा आहे. त्यांत मनाचा मोकळेपणा आहे; निःस्पृहाचा निर्भीडपणा आहे. त्यांत साधूची भूतदया आहे; माईची माया आहे. त्यांत मनोरंजन आहे, त्यांत लोक-शिक्षण आहे. त्यांत खेडवळांचा खेडवळपणा आहे. काव्य थोडें असून क्वचित् ग्राम्यताहि आहे. पण सर्वांत अध्यात्माचें सूत्र अनुस्यूत आहे, लोकोद्धाराची तळमळ प्रतिबिंबित आहे. आजहि भारूड म्हटलें कीं नाथांचेंच नांव प्रामुख्यानें पुढें येतें. भजनी मंडळी तें भारूड आवडीनें गातात.

नाथांनीं मराठीची सेवा केली अन् ग्रंथसंपत्ति निर्माण केली. त्यांनीं मराठीवरील आपलें प्रेमहि ठिकठिकाणीं व्यक्त केलें अन् मराठीच्या द्वेष्ट्यांचें तोंड बंद. केलें. 'संस्कृत वाणी देवें केली, प्राकृत तरी चोरापासून झाली?' असें त्यांना रोखठोक विचारलें अन् त्यांची ही केवळ 'अभिमान भुली' त्यांना दाखवून दिली. 'सोन्याचीं सुमनें, नवीं जुनीं' न म्हणिजे. कारण येथून तेथून एकच सोनें. 'मराठी भाषा चोखडी, परब्रह्मीं फळली गाढी,' असें तिचें मोठेपण त्यांनीं पटवून दिलें.

नाथांच्या रचनेंत विपुलता आहे आणि विविधता आहे. तींत गंगेची शुचिता आहे आणि सागराची गंभीरता आहे. तींत कुसुमाची कोमलता आहे. विनोद आहे. तींत नीति आहे, रीति आहे आणि रसांची प्रतीति आहे. तींत भावना आहे, कल्पना आहे, भाषा आहे, अन् भाषेची भूषा आहे. तींत तार्किकाची तार्किकता आहे, कवीची काव्यात्मकता आहे. तींत भावगीत आहे. तींत लोकगीत आहे. तींत खंड-काव्य आहे. तींत विडंबक काव्य आहे. तींत कथाकथन आहे. तींत स्वभावरेखन आहे. तींत पुराण आहे. अध्यात्म हा तिचा प्राण आहे. अशी नाथांनीं मराठीची सेवा केली. ती देवाघरीं पावन झाली. नाथांची रचना गोड गोड जशी पिकल्या आंब्याची फोड.

जा, आतां निजा बरें बाळांनो; मी उद्यां तुम्हांला पुढली कहाणी सांगेन.

★ ★ ★

१५. श्रीतुकाराम

या रे पंढरीच्या पाइकांनो, भागवतधर्माच्या बालकांनो, संतांच्या सेवकांनो, भोळ्या भाविकांनो, या रे या. मी आज तुम्हांला तुकारामाची कहाणी सांगत्यें. ऐका.

महाराष्ट्राच्या नगरीं, झाली पुण्याची उजरी. साधुसंतांनीं नवल केलें, भागवतधर्माचें मंदिर उभविलें. ज्ञानदेवांनीं त्याचा पाया रचला, नामदेवांनीं परकोट बांधला, नाथांनीं सभामंडप उभारला अन् तुकारामानें त्या मंदिरावर कळस चढविला. ज्ञानदेवांनीं महाराष्ट्राच्या भूमींत भक्तीचें बीज पेरलें, त्याला अद्वैताचें पाणी घातलें. नामदेवांनीं त्याला नाममंत्रानें पल्लवित केलें. नाथांनीं आपल्या चारित्र्यानें त्यावर फुलांचा भर आणला आणि कीर्तीचा परिमळ दूरवर पसरविला. त्याच वृक्षाला तुकारामानें सगुणसाक्षात्काराचें फळ आणलें आणि त्याच्याच सांवलींत बसून भक्तांनीं तें चाखलें.

इंद्रायणीच्या तीरीं वसली देहू, चला बाळांनो, आज तेथें जाऊं. धन्य काळ हा दिवस, आज तुमचे पुरले नवस. देहुडा नगरींत जिवाजी राजा तसा देहूंत तुकाराम माझा. बोल्होबाच्या कुळांत, कनकाईच्या कुशींत त्याचा जन्म झाला. त्यानें महाराष्ट्र सदाचा ऋणी केला थोरांकुळीं जन्म होणें दैवाहातीं पण जन्माचें सोनें करणें मानवी कृति.

तुकारामानें आपल्या जन्माचें सार्थक केलें आणि जगाला जीवन दिलें. किडा मुंगी जगतीं तीं जीव धरून तगतीं. पण ज्याच्या जीवनानें असंख्य जन उद्धरती त्यासच धन्य म्हणती.

बाळपणचा काळ, आयुष्याची सकाळ, तेथें खेळांचा सुकाळ. बाळपणचे खेळ म्हणजे संसाराच्या पुस्तीचे पहिले खर्डे. ज्यानें खर्डे गिरविले त्याची पुस्ती उत्तमच येणार. तुकारामानें खेळाचे खर्डे वेळेवर गिरविले, संसाराच्या पुस्तीवर सद्धर्माच्या ओळी रेखाटल्या आणि मोक्षाचीं अक्षरें वळीव काढलीं. संसाराच्या टिपरघाईंत चित्त चळूं नये म्हणून तो टिपरें खेळला. मायामोहानें फसवूं नये म्हणून चेंडू झेलण्याची संवय त्यानें आधींपासूनच केली. जन्ममरणाची कोंडी फोडून मोक्षाचें लोण सहज घेऊन जातां यावें म्हणून तो मृदंग पाट्या खेळला. वासनांना दृढनिश्चयानें दमवून फळी लावतां यावी म्हणून हुतुतूचा त्यानें सराव केला आणि कामाला कळवा घालतां यावा म्हणून तो कुरघोडी खेळला. बाळपणीं असे सगळे खेळ खेळतां खेळतां पुढें त्यांचा आगळा उपयोग केला, आणि संसारांत राहून वेगळा राहिला.

तुकारामाचे वडील बंधु सावजी आणि धाकटे कान्होबा. तिघांचींहि लग्नें झालीं. तुकारामाला बायका दोन, वडील रुखमाई अन् धाकटी जिजाबाई. सावजीनें पहिल्यापासूनच विरक्तीचा पल्लव धरिला म्हणून तेराव्या वर्षींच तुकारामावर संसाराचा भार पडला. त्यानें चार वर्षें संसार यथासांग केला, आईबापांचा पांग फेडला. पण दैवाचा दिवस ठेप्यापर्यंत कधींच पुरत नाहीं, आणि कोणाच्याहि संसाराचा गाडा सदा सुरळीत चालत नाहीं. या चार वर्षांतच तुकारामाचे आईबाप वारले. त्याच्या शिरावरचें छत्र मोडून पडलें. सावजी आधींच संसाराच्या पिंजऱ्यांतून उडून गेला. त्याची बायको झुरून मेली. दुर्दैवास हात देण्यास दुष्काळ आला. घरचं झालं थोडं, व्याह्यानं धाडलं घोडं, असा प्रकार झाला. त्या वेळचा दुष्काळ फारच भयंकर झाला. मेघाचें पाणी पडलें नाहीं. पृथ्वीवर पाणी उरलें नाहीं. नद्या आटल्या, विहिरी कोरड्या झाल्या, तळीं सुकलीं, तळीं सुकलीं, धरणी जीवनास मुकली.

धान्य पिकलें नाहीं, अन्न उरलें नाहीं. धारण वाढली. माणसें अन्नावांचून मरूं लागलीं. तुकारामाचा उदीम वाण्याचा, पण खऱ्या नाण्याचा. लांडीलबाडी करायची नाहीं. उणं तोलायचं नाहीं, खोटं बोलायचं नाहीं. तुकारामानं सढळ हातानं द्यायचं, लोकांनीं ओढाळ मनानं न्यायचं. स्वभावांत फारच भीड, त्याला 'नाहीं' म्हणायची चीड. त्यामुळें धंदा बसला. लोकांत नापत झाली. त्यांतच या दुष्काळांत त्याची वडील बायको आणि मुलगा हीं मेलीं. आशेचा कोंब जळला. असे संकटांचे मेघ चहूंकडून आले. चहूंकडून आले तसे एकदम आले आणि एकदम आले तसे गडगडून पडले. तुकारामाची दुसरी बायको जिजाई तापट स्वभावाची, आदळआपट करायची, बोलतांना भीड नाहीं धरायची. तिच्या जिभेवर फणसाचे कांटे अन् मनांत गिराचे सांठे होते. जिजाई म्हणजे ओली आग. तिच्या सहवासांत तुकारामाचें मन रमेना. त्याची वृत्ति उदास झाली, वैराग्याकडे वळली. त्यानें भक्तीची कांस धरली. तेव्हां विठ्ठल माउली प्रेमपान्हा पान्हाइली.

तुकारामाचीं संसाराकडे पाठ फिरली तशी त्यानें परमार्थाची वाट धरली. त्याला संसार वमनासारखा झाला. देव वसे ज्याचे चित्तीं, त्याची धरावी संगती, असें त्यास वाटूं लागलें. त्यानें एकांतांत जावें; ज्ञानेश्वरी, नाथभागवताचें पारायण करावें; अर्थाचें मनन करावें; परमार्थाचें चिंतन करावें. संतांचें प्रेमळ गीत पाठ करावें. त्यांचें उदारचरित आचरावें. अंगानें परोपकार करावा, दुसऱ्याचा त्रास दूर सारावा, वाणीनें हरि-नामाचा उच्चार करावा आणि मनानें विठ्ठलभेटीचा ध्यास धरावा. असा त्याचा नित्याचा क्रम असे. मनाचा मातंग रानोमाळ पळे, तुकोबा आवरी अभ्यासाच्या बळें. क्रामकोधपर्वत आड पडले ते वैराग्याच्या धगीनें ठायींच्या ठायीं वितळले. परद्रव्य परनारी झाली विषाचिये परी. ठाकला तो कांहीं उपकार केला. तुकारामाच्या भावाला आतां आकार आला. वृक्षवल्ली वनचरें हीं सोयरीं केलीं आणि सर्वांभूतीं भगवद्भाव मानण्याची वृत्ति उपजली. हेंच त्यानें आराधन केलें, त्याला पंढरीचें निधान लाधलें. भजनकीर्तनाचें साधन केलें. वाचा अनावर झाली, तिनें नामाचा छंद घेतला. मनाला लागली नामाची गोडी, ती जीव

अनुक्रमांक ११८९ नोंद दि. १५/१०/८५

गेल्या न सोडी. राम, कृष्ण नाममाला, त्यानें ओवोनिया गळां घातली, अन् अच्युताचा योग नामछेदें साधला. पांडुरंग ध्यानीं, पांडुरंग मनीं, जागृतीं, स्वप्नीं पांडुरंग झाला. विठ्ठलानं पाहिलं तुकारामानं दुःख साहिलं, अन् बेंबीच्या देठापासून आपणाला बाहिलं, तेव्हां त्यांनीं बाबाजी चैतन्याच्या मनांत प्रेरणा केली. त्यांनीं स्वप्नांत दर्शन दिलं. 'रामकृष्णहरि' हा मंत्र दिला अन् तुका मोक्षाचा अधिकारी केला. असा तुकारामानें संसार सोडला नि सखा जोडला.

भगवंतानें तुकारामावर कृपा केली तरी निंदकांनीं त्याची पहिल्यानें छळणा केली. निंदा म्हणजे उकिरडे उकरण्याचा धंदा. निंदक येतो, केरकचरा घेऊन जातो. निंदकांनीं केलेला छळ म्हणजे पहिला पूर. त्यानें दोषांची घाण वाहून जाते, सत्त्वाची नदी शुद्ध होते. तुकारामाचा छळ झाला, त्यानें त्याच्या सत्त्वाच्या सोन्याला उजळा आला. देवाजीनें कृपा केली, अभंगांची गंगा तुकारामाच्या वाणींतून निघाली. रामेश्वर-भटानें हाकाटी केली, "शांतं पापम्, शांतं पापम्", धर्म बुडाला, धर्म बुडाला, शूद्रानें ब्रह्मज्ञान सांगितलें. ब्राह्मणानें त्रागा केला, तुकारामाचा धिक्कार केला. पण तेथें तुकारामाचा उपाय नव्हता. कारण बोलविता धनी वेगळाच होता. 'काय करूं मज देवें बोलविलें', माझें खोळंबलें काय होतें? असें म्हणून तुकारामानें अभंगांच्या वह्या इंद्रायणींत टाकल्या, त्या देवानें कोरड्या राखिल्या. अभंगांत गायिलें देवाचें गीत, जगास दाविली भक्तीची रीत. सर्वांनीं पाहिलें तुकारामाचें चित्त शुद्ध झालें. शत्रूचे मित्र झाले, विषाचें अमृत झालें. डुमडुम डाळकं, दुष्टांचं शेकलं टाळकं. ओढ्याच्या खडकांत वाळकं आलीं, पिंपळाला काकड्या आल्या, कारल्याच्या वेलाला आंबे आले. निंदकांच्या नांग्या मोडल्या. ते तुकारामाचे शिष्य झाले. असा ब्रह्मानंद तुके, तुळे आला तुका, तो हा विश्वसखा क्रीडे जनीं. तो अमृताची वाणी वर्षला, आणि त्यानें अज्ञजन उद्धरिला.

तुकारामानें पुष्कळ अभंग रचिले, त्यांत भक्तिभावांनीं रसरंग भरले. देवाच्या भेटीसाठीं जिवा लागलेली तळमळ दाखविली, तर कधीं 'वाटुली पाहतां शिणले डोळुले', अशी भेटीची उत्कंठा दर्शविली. 'शरण

आले त्यासी न दावी हे पाठी,' अशी त्याची परिपाठी सांगितली. तर कधीं तो अजून पावला नाहीं म्हणून 'कां हो केली ऐशी निष्ठुरता' म्हणून विचारलें. कधीं 'जाळोनी संसार बैसलों अंगणीं, नाहीं तुझ्या मनींमानसींहि,' असा देवावर आरोपहि केला. तर कधीं 'ताकें कृपण तो जेउं काय घाली,' असा त्याचा उपहास केला. आळवितां आळवितां कंठ शोषला, तरी देव पावला नाहीं, म्हणून वैतागानें 'माझे लेखीं देव मेला, असो त्याला असेल,' असेंहि म्हणण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. 'आम्ही तुझे म्हणवितों, परि तुज नाहीं आमुचे उपकार नामरूपा थोर केलियाचे,' असें म्हणून देवाला भक्तांनीं नांवारूपाला आणिलें; पण देव त्यासच विसरतो, असें त्याचें गाऱ्हाणें केलें. सोळा सहस्र होऊं येते, पण माझ्यासाठीं मात्र तुला येतां येत नाहीं, अशी आवडनिवड करणें, हें देव म्हणून संपादे, असा त्यास टोमणा मारला. 'आम्हीं जाणावें तें काई तुझें वर्म कोणे ठायीं ?' अशी आपली अज्ञता प्रकटिली, तर कधीं 'तुझे दारींचा कुतरा, नको मोकलूं दातारा', अशी आपली अशरणता आणि तळमळ उघड केली. कधीं, 'तूं माझी माउली मी तुझें लेंकरूं,' असें म्हणून लाड घातला, तर कधीं 'तूं माउलीहूनि मयाळ, चंद्राहूनि शीतळ, पाण्याहूनि पातळ, कल्लोळ प्रेमाचा,' म्हणून भक्ति-रसाला उधाण आणलें. त्याच्या अभंगांत कधीं देवाशीं विनोद आहे, कधीं वाद आहे, आणि कधीं संवाद आहे. कधीं त्यानें देवाशीं लाड घातले, कधीं आग्रह धरला आणि कधीं निग्रह दाखविला. त्याच्या अभंगांत जिवाचा जिव्हाळा आहे, अंतःकरणाचा उमाळा आहे, करुणेचा कळवळा आहे, भक्तीचा सोहळा आहे, कोमलतेचा कोंब आहे, कल्पनांचा कदंब आहे, प्रेमळतेचा गोडवा आहे, आणि मोक्षाचा पाडवा आहे.


तुकारामानें स्वतःचा उद्धार केला अन् इतरांनाहि मार्ग दाखविला. वारकऱ्याची पताका सगळ्या महाराष्ट्रांत मिरविली. तुकारामानें खेड्या-पाड्यांत पंढरी फिरविली. त्यानें भक्तिमार्गाचा प्रसार केला, सगुणभक्तीचा पुरस्कार केला. भक्ति ही गोदा, उघडी संपदा, कोणींहि यावं, केव्हांहि यावं, पोटभर रस चाखावा, अन् मोक्षाचा ढेंकर द्यावा. हींत जात नाहीं,

गोत नाहीं, आप नाहीं, पर नाहीं, लहान नाहीं, थोर नाहीं, महार नाहीं, पोर नाहीं. हिला काळ नाहीं, हिला वेळ नाहीं, स्त्रीपुरुषांचा भेद हिच्याजवळ नाहीं. सगळ्यांनीं यावं, आगळं व्हावं, भक्तीचं लेणं अंगभर ल्यावं, जगभर नाचावं, परमेश्वराशीं एकरूप व्हावं. तुकारामानें भोळ्याभाविकांना, स्त्रीशूद्रांना 'भक्तीचा मार्ग अगदीं सोपा, यानें चुकती जन्ममरणाच्या खेपा, यासी तुळे ऐसें कांहीं, दुजें त्रिभुवनीं नाहीं.' भक्तीसाठीं फार खटाटोप नको. मनांत भाव धरावा, दृढनिश्चयानें अभ्यास करावा, परद्रव्याला अंध व्हावें, परनिंदेतें मुकें असावें, परावीया नारी माउलीसमान मानावी, परोपकार करावा, संतसंग धरावा, दंभ दूर सारावा, 'निर्वैद व्हावें सर्व भूतांसवें.' अन्न आच्छादन हें तो प्रारब्धाअधीन आहे, त्याची काळजी करूं नये. एरवीं मुखीं विठोबाचें नाम, हाच असावा नेमधर्म. बीज आणि फळ हरीचें नाम आहे. तेंच सकळ पुण्य आहे. तोच सगळा धर्म आहे, नव्हे सकळा कळांचें तें वर्म आहे. जेथें कीर्तन आणि नामघोष, तेथें सकळ ओथंबले रस. त्यासाठीं आश्रम सांडावा लागत नाहीं, अन् श्रम करावे लागत नाहींत. 'पुरें एक नाम विठोबाचें.' 'हेंचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा,' असें जें स्वतःसाठीं त्यानें सांगितलें तेंच लोकांनाहि सांगितलें.

तुकारामाचें लिहिणें सूत्रमय, वाणी खणखणीत, सदा प्रसन्न, प्रसंगीं राकट अन् सुरीच्या धारेसारखी तिखट. तींत दिव्यस्फूर्ति आहे, प्रखरता आहे, अलौकिक तेज आहे. तुकारामाची वाणी रत्नाची खाणी. तींतून निघाले अभंग हिरे, त्यांवर पाडले भावअर्थाचे कंगोरे. झिळमिळ झळके हिऱ्यांचें पाणी, तळमळ निववी तुकारामाची वाणी. तुकारामाची वाणी सुढाळ मोतीं, जगांत उजळती भक्तीच्या चंद्रज्योती. चंदन घासतां सुवास सुटतो, तुकारामाचा अभंग गातां सद्भाव उठतो. सूर्याचे किरण मोजतां मोजवत नाहींत, तुकोबाचे गुण गातां सरत नाहींत. चंद्राचं चांदणं पदरीं बांधूं कशी अन् तुकारामाच्या अभंगांची गोडी शब्दांनीं सांगूं कशी? तुकारामाची वाणी प्रेमाची सरिता, तें प्रेम नये बोलतां, सांगतां, दावितां, अनुभव चित्ता चित्त जाणें.

—समाप्त—




REFBK-0010237